रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २५३
www.ramprahar.com
सोमवार, १ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## आयकर विभागाची काँग्रेसला नवी नोटीस




**नवी दिल्ली** : ऐन निवडणुकीच्या काळात काँग्रेस पक्षासमोरील अडचणी कमी होण्याची चिन्हे नाहीत. एकीकडे मोठ-मोठे नेते पक्ष सोडत आहेत, तर दुसरीकडे पक्षासमोर कायदेशीर अडचणी उभ्या राहत आहेत. आता नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार आयकर विभागाकडून काँग्रेसला नवीन नोटीस मिळाली आहे, ज्यामध्ये २०१४-१५ ते २०१६-१७ या वर्षांसाठी १,७४५ कोटींचा कर भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या नव्या नोटिसीसह आयकर विभागाने काँग्रेसकडे एकूण ३,५६७ कोटींचा कर भरण्याची मागणी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही नवीन कराची नोटीस २०१४-१५ (६६३ कोटी रुपये), २०१५-१६ (सुमारे ६६४ कोटी रुपये) आणि २०१६-१७ (सुमारे ४१७ कोटी रुपये) याच्याशी संबंधित आहे. काँग्रेसच्या खात्यांमध्ये अनेक बेहिशेबी व्यवहार झाले आहेत.

# भ्रष्टाचाराविरोधात लढाई सुरूच राहील

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा इंडिया आघाडीवर हल्लाबोल

**मेरठ : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि.३१) उत्तर प्रदेशच्या मेरठमध्ये जाहीर सभेला संबोधित करीत इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला. मी माझ्या देशाला भ्रष्टाचाऱ्यांपासून वाचवण्यासाठी मोठी लढाई लढत आहे. त्यामुळेच आज मोठे भ्रष्टाचारी तुरूंगात आहेत. सर्वोच्च न्यायालयातूनही जामीन मिळत नाही. भ्रष्ट लोकांनी कान उघडे ठेवून ऐकावे, तुम्ही माझ्यावर कितीही हल्ले केले तरी मी थांबणार नाहीत. भ्रष्टाचारी कितीही मोठा असला तरी त्याच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल, असा इशारा पंतप्रधान मोदींनी या वेळी दिला.

मी भ्रष्टाचाराविरुद्ध पूर्ण ताकदीने लढत असताना त्यांनी इंडिया आघाडी केली आहे. त्यांना वाटते मोदी घाबरेल,



पण माझा भारत माझे कुटुंब आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, अनेक भ्रष्ट लोक तुरूंगात आहेत. सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर होत नाही. काही ठिकाणी पलंग आणि भिंतींमध्ये चलनी नोटांचे ढीग सापडले आहेत. वॉशिंग मशीनमधून पैशांचे ढीग बाहेर पडत आहेत, मात्र ज्याने देश लुटला त्याला ते परत द्यावेच लागेल.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, देशाच्या तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याचे काम सध्या सुरू आहे. २०२९मध्ये हिशोब घ्या. देशात भ्रष्टाचाराविरुद्ध मोठा लढा सुरू आहे. गरिबांचा पैसा कुणालाही हडप करता येणार नाही. साडेतीन लाख कोटींची बचत झाली. भ्रष्टाचार हटवण्याची मोदींची गॅरेंटी आहे, पण ते भ्रष्टाचार वाचवा असे म्हणतात. तेव्हा आता निर्णय तुम्हालाच घ्यायचा आहे.

देशात दोन लाखांहून अधिक गोदामे बांधली जात आहेत. तुमचा पैसा वाचवण्यासाठी एनडीए सरकार या दिशेने काम करीत आहे. आम्ही एक नवीन योजना घेऊन आलो आहोत. पीएम सूर्य घर मोफत वीज योजना. यामुळे तुमच्या घराचे वीज बिल शून्य होईल, प्रत्येक कुटुंबाला मोफत वीज मिळेल. सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी सरकार ७५ हजार रुपयांची मदत देणार आहे. सरकार स्थापन होताच या कामाला गती देईन, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

देशातील पहिला नमो भारत कॉरिडॉर दिल्ली ते मेरठपर्यंत बांधण्यात आला आहे. मेरठ मेट्रोवर वर्क-एक्स्प्रेस मार्ग बांधला जात आहे. ध्यानचंद क्रीडा विद्यापीठ बांधले जात आहे. रोजगाराच्या संधी निर्माण होतील. भाजप, आरएलडी आणि घटक पक्षांनी मेहनत घेतली आहे. अरुण गोविल, राजकुमार सांगवान, संजीव बालियान, भाई चंदन, प्रदीप चौधरी यांना भरघोस मतांनी विजयी करण्याची प्रार्थना करण्यासाठी मी आलो आहे. मतदानासाठी बाहेर पडा. तुमचे मत विकसित भारतासाठी असेल, असे आवाहनही या वेळी पंतप्रधान मोदींनी नागरिकांना केले.

# मनसे, शेकाप पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षात इनकमिंग सुरूच असून महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट सेनेचे पनवेल महानगरप्रमुख गणेश सरवणकर आणि शेतकरी कामगार पक्षाचे युवक पदाधिकारी आदित्य हरिश्चंद्र शेळके, सुरज सवदे यांनी रविवारी (दि.३१) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी या पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

भाजपचे विचार आणि कार्यपद्धती पाहून विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपच्या राष्ट्रीय प्रवाहात दाखल होत आहेत. पनवेलमध्येही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकासकामांवर प्रभावित होऊन युवावर्ग भाजपकडे आकर्षित होत आहे. अशाच प्रकारे मनसे व शेकापच्या पदाधिकाऱ्यांनी 'कमळ' हाती घेतले. आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व इतर मान्यवरांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या पक्षप्रवेशावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अभिषेक भोपी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणींना 'भारतरत्न' प्रदान

### राष्ट्रपतींनी घरी जाऊन केला सन्मान

**नवी दिल्ली** : माजी उपपंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना रविवारी (दि.३१) भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अडवाणी यांच्या घरी जाऊन त्यांना देशाचा हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखडही उपस्थित होते.

प्रकृतीच्या कारणास्तव लालकृष्ण अडवाणी शनिवारी राष्ट्रपती भवनात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहू शकले नव्हते.



## क्रिकेटपटू केदार जाधवने घेतली उपमुख्यमंत्री फडणवीसांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा स्टार क्रिकेटपटू केदार जाधव याने रविवारी (दि.३१) भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मिळालेल्या माहितीनुसार मूळचा पुणेकर असलेल्या केदार जाधव याने आपल्या खासगी कामासाठी उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली आहे.

या भेटीवेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार हेदेखील उपस्थित होते.

## निवडक

### काँग्रेस नेत्या सावित्री जिंदाल यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली** : हरियाणाच्या माजी मंत्री आणि



उद्योजिका सावित्री जिंदाल यांनी लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेसला रामराम ठोकत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. पती जिंदाल ग्रुपचे संस्थापक ओम प्रकाश जिंदाल यांच्या निधनानंतर त्यांनी जिंदाल समुहाच्या अध्यक्षपदाची सुत्रे स्वीकारली आणि पुढच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू केली. भारतीय व्यवसाय आणि राजकारणात त्यांचे नाव आदराने घेतले जाते.

### बागेश्वर बाबांचे भंडाऱ्यात आक्षेपार्ह वक्तव्य; गुन्हा दाखल

**भंडारा** : धीरेंद्र शास्त्री म्हणजेच बागेश्वर बाबा यांनी भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी शहरात सत्संगामध्ये मानवधर्माची शिकवण देणाऱ्या बाबा जुमदेव महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान करीत टीका केली. त्यामुळे असंख्य सेवकांचे मन दुखावल्याने विविध पोलीस ठाण्यांमध्ये धीरेंद्र शास्त्री यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## विवाहबाह्य प्रेमसंबंधातून खोपोलीत एकाची हत्या

### महिलेसह दोन जणांना अटक

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

प्रियकर लग्न करीत नसल्याने प्रेयसीने त्याला परभणीहून खोपोलीत बोलावून साथीदारांच्या मदतीने झोपेच्या गोळ्या देऊन गळा दाबून हत्या केली. त्यानंतर एका बॅगेतून मृतदेह कोल्हापूर हद्दीत नेत जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. खोपोली पोलिसांनी हत्येचा छडा लावत प्रेयसीसह दोन साथीदारांना अटक केली. खालापूर न्यायालयाने आरोपींना ५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राजेंद्र सुभाष बांडे (वय ३०, रा. जिंतूर, परभणी) आणि खोपोली येथील सुनिता सुभाष देवकाई (वय ४४) यांचे विवाहबाह्य प्रेमसंबंध होते. लग्नाचे प्रलोभन दाखवून राजेंद्र हा सुनिताकडून वारंवार पैसे उकळत होता, मात्र लग्न करण्यास टाळाटाळ करीत होता. त्यामुळे सुनिताने राजेंद्रला २४ मार्च रोजी खोपोलीतील मोगलवाडी येथील एका घरात बोलावून घेतले. याच ठिकाणी त्यांची गाठभेट होत राहिली. २७ मार्चला सुनिताने राजेंद्रला झोपेच्या गोळ्या दिल्या व साथीदारांच्या मदतीने त्याचा गळा आवळून खून केला. त्यानंतर २९ मार्चला राजेंद्रचा मृतदेह कोल्हापूर येथील मम्मेवाडी घाटाजवळ पेट्रोल व हरभऱ्याचा पेंढा टाकून जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी तपासचक्र फिरवून सुनिता, तिचा मुलगा सुरेश सुभाष देवकाई (वय २९), साथीदार अमित पोटे (रा. सळे ता. आजरा, जि. कोल्हापूर) यांना अटक केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.





**अलिबाग : शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या व माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे नुकतेच प्रदीर्घ आजाराने निधन झाले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांनी रविवारी पेझारी येथे जाऊन स्व. मीनाक्षीताईंना आदरांजली वाहिली तसेच पाटील परिवाराचे सांत्वन केले. या वेळी आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, युवा नेते आस्वाद पाटील व कुटुंबीय उपस्थित होते.**

## आरटीई प्रवेशासाठी यंदा ७५,८५६ शाळांमध्ये तब्बल पावणे दहा लाख जागा

### येत्या आठवड्यात सुरू होणार प्रवेश प्रक्रिया

**पुणे : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायद्यातंर्गत (आरटीई) केलेल्या बदलांमुळे या प्रवेश प्रक्रियेत यंदा मोठ्या प्रमाणात जागा वाढल्या आहेत. राज्यभरातील ७५ हजार ८५६ शाळांमधील नऊ लाख ७१ हजार २०३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या असून येत्या आठवड्यात विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किमी अंतरावर शासकीय किंवा खासगी अनुदानित शाळा नाही, त्यांना खासगी इंग्रजी शाळांचा पर्याय उपलब्ध राहणार आहे, पण पहिल्यांदा विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार खासगी अनुदानित शाळांमध्ये प्रवेश घेता येणार आहे.

आरटीई अंतर्गत वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिले जातात. आरटीई संकेतस्थळावरील माहितीनुसार राज्यात ७५ हजार ८५६ शाळांमध्ये नऊ लाख ७१ हजार २०३ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. येत्या आठवड्यात विद्यार्थ्यांची नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.

### विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशासाठी प्राधान्यक्रम

- आरटीई प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना सर्वप्रथम खासगी अनुदानित शाळांचा पर्याय निवडता येईल.
- खासगी अनुदानित शाळांमध्ये प्रवेश हाऊसफुल्ल झाल्यास दुसरा पर्याय सरकारी शाळांचा निवडता येणार आहे.
- सरकारी किंवा खासगी अनुदानित शाळा घरापासून एक किमी अंतरावर नसल्यास खासगी इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेता येईल.

# पनवेल महापालिकेचा मालमत्ता कर वसुलीचा विक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात ३६० कोटींची वसुली केली असून हा आजवरील विक्रम आहे. तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभागाने गेले वर्षभर नियोजनबद्ध रूपरेषा आखून वसुलीचा हा विक्रम केला आहे.




मालमत्ता कर विभागाचे उपायुक्त गणेश शेटे यांच्या नियंत्रणाखाली उपाययोजना राबवत एकूण ६४७ कोटी इतका महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा करून घेण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार उच्च न्यायालयाने महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस कोणतीही स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी मालमत्ता कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या महिनाभरात मालमत्ता कर विभागाचे सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, कर अधीक्षक महेश गायकवाड व सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली चारही प्रभागामंध्ये मार्च महिना संपेपर्यंत कर्मचाऱ्यांनी नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी कोणतीही सुटी न घेता शनिवार, रविवारीदेखील कार्यालये सुरू ठेवली. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व्यावसायिक मालमत्ता करधारकांकडून वसुलीची थेट कारवाई सुरू केली. यासाठी महापालिकेच्या वतीने १७ पथके तयार करण्यात आली होती. प्रभाग अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ही पथके सर्व प्रभागांमध्ये वसुलीसाठी जात होती. याचबरोबर मालमत्ता कर अतिरिक्त भारत राठोडही या पथकासोबत प्रत्यक्ष वसुलीच्या कामामध्ये सहभागी झाले होते.

विकासकामे करण्यासाठी महापालिकेकडे मालमत्ता कर हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असल्याकारणाने वेळोवेळी सावध पाऊले उचलली गेली. पनवेल महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून पालिकेने सिडको हस्तांतरीत भाग, एमआयडीसी, मार्बल मार्केट, जवाहर औद्योगिक वसाहत अशा भागांमध्ये व्यावसायिक मालमत्ता करधारकांडून वसुलीची थेट कारवाई सुरू केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीस दिल्या होत्या यांना आता वॉरंट नोटीस देण्याचे काम सुरू आहे तसेच अटकावणीच्या मोहिमेलाही सुरुवात करण्यात आली आहे. परिणामी मालमत्ता करांमध्ये भरघोस वाढ होताना दिसली. मार्च महिन्यात एकूण ५२ कोटींची वसुली झाली. यामध्ये ३० मार्च या एकाच दिवशी १२ कोटींची विक्रमी वसुली झाली तसेच ३१ मार्च संध्याकाळी ६ वाजेपर्यंत एकूण ३६० कोटींची सर्वाधिक वसुली महापालिकेने केली आहे.

पालिकेने मालमत्ताधारकांच्या आक्षेप व हरकतीनुसार त्यांच्या बिलात सुधारणा करून दिली आहे. यापुढेही सूचना किंवा आक्षेप असल्यास तो नोंदवावा आणि मालमत्ता कर भरून पनवेलच्या विकासास हातभार लावावा, असे आवाहन आहे.

# यंदा उन्हाळ्यात राज्यभर पुरेसा रक्तसाठा

## नागरिकांचा रक्तदान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

दरवर्षी उन्हाळ्यामध्ये रक्ताचा प्रचंड तुटवडा निर्माण होतो आणि त्यामुळे रुग्णांचे हाल होतात. यातून मार्ग काढण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदेने आध्यात्मिक आणि सामाजिक संस्थांना रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत राज्यभरात फेब्रुवारीमध्ये ८४७ रक्तदान शिबिरे घेण्यात आली. त्यामुळे राज्यात रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध झाला आहे.



दरवर्षी उन्हाळ्यात निर्माण होणारा रक्ततुटवड्याचा प्रश्न लक्षात घेत यंदा राज्य रक्तसंक्रमण परिषदेने आधीपासून प्रयत्न सुरू केले. त्यानुसार रक्तसंक्रमण परिषद आणि श्री जगद्‌गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानातर्फे १० ते २५ फेब्रुवारीदरम्यान राज्यभर विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे घेण्यात आली. १५ दिवसांत ८४७ रक्तदान शिबिरांचे आयोजन करून ७८,२२१ युनिट रक्त संकलित करण्यात आले.

उन्हाळ्यामध्ये रक्तदान केल्याने आरोग्यावर कोणताही दुष्परिणाम होत नाही, मात्र रक्तदान करण्यापूर्वी संबंधित व्यक्ती भर उन्हातून गेली असेल किंवा तिच्या शरीरातील पाणी कमी झाले असेल (निर्जलीकरण) तर तिने रक्तदान करू नये. निर्जलीकरण झालेले असताना रक्तदान केल्यास रक्तदाब कमी होण्याची किंवा चक्कर येण्याची शक्यता असते. त्यामुळे रक्तदानापूर्वी थोडी विश्रांती घ्यावी आणि भरपूर पाणी प्यावे, असे आवाहन इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन, मुंबईचे सचिव डॉ. भरत जगियासी यांनी केले.

### ...यामुळे होते उन्हाळ्यात रक्तटंचाई

*उन्हाळ्यात मार्च ते मे दरम्यान नागरिक पर्यटनाला किंवा गावाकडे जातात. नागरिकांचा फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने रक्तदान शिबिरे आयोजनाचे प्रमाण घटते. परिणामी दरवर्षी उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर रक्ततुटवडा निर्माण होतो. त्यामुळे राज्य रक्तसंक्रमण परिषदेकडून गणेशोत्सव मंडळे, धार्मिक संस्था, सामाजिक संस्था, विविध संघटना, मित्र मंडळांना रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे आवाहन केले जाते.*

# महाविकास आघाडीत एकोपा नाही

## 'वंचित'चे प्रकाश आंबेडकर यांची टीका

**नागपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीकडून वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू होते, मात्र वंचितचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आघाडीचा प्रस्ताव फेटाळत आपल्या उमेदवारांची घोषणा केली. या संदर्भात त्यांनी महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षांत आताही एकोपा नाही. प्रत्येक पक्ष स्वतंत्र उमेदवार यादी जाहीर करीत आहेत, असे म्हणत बोट ठेवले आहे.



आंबेडकर म्हणाले की, महाविकास आघाडीतील काही जागांवरील तिढा अद्यापही कायम आहे. त्यामुळे अशांसोबत आम्ही पुन्हा जाऊन बिघाड घालणे योग्य नाही 'मविआ'ला २७ उमेदवारांची यादी दिली होती. प्रस्थापितांविरोधात विस्थापित अशी ही निवडणूक होणार आहे. प्रस्थापित पक्ष आणि नेत्यांना वंचित उमेदवारांना समोर येऊ द्यायचे नसल्यानेही 'मविआ'सोबत जाता आले नाही, असा आरोपही आंबेडकर यांनी केला.

आघाडीची बोलणी सुरू असताना २७ जागांवरील उमेदवारांची यादी दिली होती. या जागांचा आम्ही अभ्यास केला होता. आता त्याला कुणी गांभीर्याने घेतले नाही, असेदेखील आंबेडकर या वेळी म्हणाले.

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने 'एकला चलो रे'ची भूमिका घेत उमेदवार जाहीर केले. त्याआधी आणि त्यानंतरही वंचित विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगत आहे. आंबेडकर हे वारंवार आघाडीतील त्रुटी, उणिवा बाहेर काढत असून ते कसे चुकत आहेत हे दाखवून देत आहेत.

# नवी मुंबईत प्लास्टिक जप्तीची कारवाई

## ९० हजारांचा दंड वसूल

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्र एकल वापर प्लास्टिकमुक्त असावे या दृष्टीने महापालिकेच्या वतीने याविषयी जनजागृती करण्यासोबतच प्रतिबंधात्मक मोहीमा प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमेंतर्गत २६ व २७ मार्च रोजी सर्व विभागीय कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी तपासणी करण्यात आली तसेच धडक कारवाई करीत दंडात्मक कारवाई तसेच प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली. यामध्ये एकूण ९० हजार रू. दंडात्मक रक्कम तसेच २८ किलो ७०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले.



यामध्ये बेलापूर विभागात चार व्यावसायिकांवर कारवाई करीत २० हजार दंडात्मक रक्कम व सात किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. नेरूळ विभागात दोन व्यावसायिकांवर कारवाई करीत १० हजार दंडात्मक रक्कम व चार किलो एकल वापर प्लास्टिकची जप्ती केली. वाशी विभागातही तीन व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली व त्यामध्ये १५ हजार दंड वसूली व तीन किलो प्लास्टिक जप्ती करण्यात आली. तुर्भे विभागात तीन व्यावसायिकांवरील कारवाईत १५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि आठ किलो एकल वापर प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला.

कोपरखैरणे विभागातील कारवाईत १० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि २.५ किलो प्लास्टिक साठा जप्ती दोन व्यावसायिकांकडून करण्यात आली, तसेच घणसोली विभागातून एक व्यावसायिकावर कारवाई करीत पाच हजार रक्कमेची दंडवसूली व एक किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. ऐरोली विभागातही १० हजार दंडात्मक रक्कम आणि दोन किलो ३०० ग्रॅम प्लास्टिक साठा दोन व्यावसायिकांकडून जप्त करण्यात आला.

याशिवाय परिमंडळ २च्या भरारी पथकाने एक व्यावसायिकाकडून ९०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्ती आणि पाच हजार दंडात्मक रक्कम वसूल केलेली आहे. अशाप्रकारे ९० हजार दंडात्मक रक्कम वसुली तसेच २८ किलो ७०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिकचे साहित्य १८ व्यावसायिकांकडून जप्त करण्यात आलेले आहे. नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ही प्लास्टिक वापर प्रतिबंधात्मक कारवाई अशीच सुरू राहणार असून नागरिकांनीही एकल वापर प्लास्टिक वापर पूर्णपणे थांबवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# श्रीलंकेला कच्चातिवू बेट देऊन काँग्रेसने अखंडता कमकुवत केली

## पंतप्रधात नरेंद्र मोदी यांचा घणाघात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि.३१) श्रीलंकेला कच्चातिवू बेट देण्याच्या निर्णयावरून काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. काँग्रेस देशाची अखंडता आणि हित कमकुवत करीत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. मोदींची ही प्रतिक्रिया माहितीच्या अधिकाराच्या रिपोर्टनंतर आली आहे, ज्यामध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने १९७४मध्ये श्रीलंकेला कच्चातिवू बेट कसे दिले होते, याबाबत खुलासा झाला आहे.



आरटीआय रिपोर्ट हा डोळे उघडणारा आणि धक्कादायक असल्याचे वर्णन करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, या कृतीमुळे लोकांना राग आला आहे आणि काँग्रेसवर कधीही विश्वास ठेवता येणार नाही. नरेंद्र मोदी यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत एक ट्विट केले आहे.

सोशल मीडिया पोस्टमध्ये पंतप्रधानांनी म्हटले आहे की, हे डोळे उघडणारे आणि धक्कादायक आहे! नवीन तथ्ये उघड करतात की, काँग्रेसने कसे कच्चातिवू बेट श्रीलंकेला सुपूर्द केले. याचा प्रत्येक भारतीयाला राग आहे आणि आपण काँग्रेसवर कधीच विश्वास ठेवू शकत नाही हे लोकांच्या मनात आहे. भारताची एकता, अखंडता आणि हित कमकुवत करणे ही काँग्रेसची कार्यपद्धती आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील याबाबत ट्विट केले आहे. काँग्रेसने स्वतः कच्चातिवू सोडले आणि त्यांना याबद्दल कोणताही पश्चात्ताप झाला नाही. कधी काँग्रेसचे खासदार देशाचे विभाजन करण्याविषयी बोलतात, तर कधी भारतीय संस्कृती आणि परंपरांना बदनाम करतात. यावरून ते भारताच्या एकता आणि अखंडतेच्या विरोधात असल्याचे दिसून येते. त्यांना फक्त आपला देश तोडायचा आहे, असे केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

# दृष्टीहीन मतदारांना ऑडिओ स्वरूपात मिळणार माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह राज्यातील दृष्टिहीन मतदारांसाठी राज्य निवडणूक आयोगातर्फे अभिनव प्रयोग राबवण्याची तयारी सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या अंतर्गत, राज्यातील दृष्टिहीन मतदारांना मतदार नोंदणीपासून ते मतदानापर्यंतची सर्व माहिती ऑडिओ स्वरूपात देण्याचा विचार आयोगातर्फे सुरू आहे. 'वोटर इन्फो ब्रोशर'असे या ऑडिओ माहितीपुस्तकाचे नाव असून यासाठी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड या संस्थेचीही मदत घेतली जाणार आहे, अशी माहिती राज्य निवडणूक मुख्य अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी दिली.

राज्यातील दृष्टिहीन मतदारांसाठी यंदाही मतदानकेंद्रांवर ब्रेल लिपीमध्ये उमेदवारांची माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात सध्या एक लाख १६ हजार दृष्टिहीन मतदारांची नोंदणी पूर्ण झाली आहे. या सर्व मतदारांना आयोगातर्फे मतदार पावती पोहोचवण्याचे काम सुरू आहे. ही पावती ब्रेल लिपीमध्ये असेल. त्यामुळे या मतदारांना त्यांचे मतदान केंद्र, खोली क्रमांक आदी माहिती मिळणार आहे.

निवडणूक आयोगातर्फे मतदान केंद्रांमध्ये उमेदवारांची नावे व त्यापुढे त्यांचे क्रमांकही ब्रेल लिपीत लिहिलेले असतील. त्यामुळे दृष्टिहीन मतदार मतदान करण्यासाठी जातील, तेव्हा मतदानयंत्रावरील (ईव्हीएम) ब्रेल क्रमांकाच्या आधारे मतदान करणे त्यांना शक्य होईल. दरम्यान, दृष्टीहिन मतदारांना निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील सर्व माहिती ऑडिओ स्वरूपात देण्यासाठी राज्य निवडणूक आयोग काम करीत असून यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. निवडणुकीसाठी मतदार म्हणून नोंदणी कशाप्रकारे करता येईल, मतदारयादीतील नाव कसे शोधावे, तसेच मतदान कसे करावे, याविषयीही मार्गदर्शन या ऑडिओच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या ऑडिओच्या पूर्ततेसाठी आयोग युद्धपातळीवर यावर काम करत असून राज्यातील पाचही टप्प्यांत ही सुविधा मतदारांना मिळावी, यासाठी प्रयत्नशील आहेत.

## हॉटेलमधील कर्मचाऱ्याने रोख रक्कम केली लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील एका हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्टचे काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने हॉटेलमधील काऊंटरमध्ये ठेवलेले ३३ हजार ८०४ रुपये चोरी करून पळून गेल्याची घटना घडली आहे.

अमन केडीया (वय ३२) असे या चोरट्याचे नाव असून त्याने हॉटेलच्या काऊंटरमध्ये ठेवलेले व कस्टमरने रूम भाड्याचे दिलेले पैसे असे एकूण ३३ हजार ८०४ रुपये घेऊन पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांनी रंगपंचमी साजरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील अनेक वर्षांपासून सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या लाईन आळी येथील शिवशक्ती मित्र मंडळाने यंदाच्या वर्षीसुद्धा होळी व रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात व विविध सांस्कृतिक व धाार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला.



मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, मार्गदर्शक समाजभूषण व रायगड रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले रमेश गुडेकर यांच्यासह मंडळाचे अध्यक्ष गौरव वेदक, उपाध्यक्ष संदीप पाटील, कार्याध्यक्ष खंडेश धनावडे, कार्याध्यक्ष समीर कदम, कार्याध्यक्ष प्रकाश वाघे, सहकार्याध्यक्ष प्रवीण पोवार, संयुक्त चिटणीस प्रशांत नरसाळे, हिशाोब तपासणीस अरुण ठाकूर, खजिनदार संतोष तळेकर व सहखजिनदार अनिकेत जाधव आदींसह मंडळातील इतर सदस्यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही होळी व रंगपंचमी उत्सव तसेच शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.

यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ मान्यवरांच्या हस्ते झाला, तसेच कार्यक्रमानिमित्त सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

मंडळाचे मार्गदर्शक रमेश गुडेकर यांनी यानिमित्ताने उभारलेल्या विनम्र अभिवादन फलकाचे कौतुक पनवेलकरांनी केले.

# हिरवळ महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेजमध्ये गुरुवारी (दि.२८) तिथीनुसार महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिक्षक व विद्यार्थी किल्ले रायगडावरून शिवज्योत घेऊन आले.

महाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या ऐतिहासिक पावनभूमीतून पालखी मिरवणुकीला प्रारंभ झाल्याने उत्सवाला अजूनच शोभा आली. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे सचिव संतोष बुटाला, महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर, महाविद्यालयीन विद्यार्थी संघटनेची जनरल सेक्रेटरी कुमारी साक्षी वर्मा तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी या सोहळ्याला उपस्थित होते.

पालखी मिरवणूक महाडच्या मध्यवर्ती मार्गाने छत्रपती शिवाजी महाराज चौक–स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, बेंगलोर बेकरी, जय अंबे मिठाई स्टोअर–बस स्टँडमार्गे–धारिया पेट्रोलपंपवरून महाविद्यालयाच्या आवारात मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

स्मरणोत्सवाचा एक भाग म्हणून महाविद्यालयाने शिवाजी महाराजांचे जीवन आणि वारसा यावर सुशांत चौगुले यांच्या व्याख्यानांचे आयोजन केले होते. याच जल्लोषाच्या वातावरणात भर घालत, विद्यार्थ्यांनी उत्साही लेझिम नृत्य सादरीकरणाद्वारे त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करत मिरवणुकीच्या उत्साहात अजूनच भर घातली.

ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी, शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा सन्मान करण्याच्या महाविद्यालयाच्या बांधिलकीबद्दल अभिमान व्यक्त केला. संचालिका सोनाली धारिया यांनी शिवाजी महाराजांच्या धैर्यातून आणि नेतृत्वातून प्रेरणा घेऊन अडथळ्यांवर मात करून महानता प्राप्त करूया. त्यांचा वारसा आपल्याला निर्भय आणि न्यायी राहायला शिकवतो. त्यांची तत्त्वे आपल्याला उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करतात, असे मत व्यक्त केले.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चिरंतन वारशाचे, त्यांच्या शौर्याचे, लवचिकतेचे आणि नीतिमत्तेसाठी वचनबद्धतेचे अनुकरण करूया. त्यांचा वारसा आपल्याला सत्यनिष्ठा टिकवून ठेवण्याची आणि अन्यायाविरुद्ध खंबीरपणे उभे राहण्याची आठवण करून देतो असे मत व्यक्त केले.



# पश्चिम रेल्वेकडून साप्ताहिक विशेष गाड्यांना मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

रेल्वे प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने मुंबई–जयपूर, मुंबई–अजमेर आणि मुंबई–बिकानेर साप्ताहिक विशेष गाड्यांना मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या सुटीत गावी जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पश्चिम रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, ट्रेन क्रमांक ०९७२४ वांद्रे टर्मिनस–जयपूर साप्ताहिक विशेष जी यापूर्वी २८ मार्चपर्यंत अधिसूचित करण्यात आली होती, ती आता २७ जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे. ट्रेन क्रमांक ०९७२३ जयपूर–वांद्रे टर्मिनस साप्ताहिक विशेष पूर्वी २७ मार्चपर्यंत अधिसूचित करण्यात आली होती. ती आता २६ जून पर्यंत वाढवण्यात आली आहे, तसेच ट्रेन क्रमांक ०९६२२ वांद्रे टर्मिनस–अजमेर साप्ताहिक विशेष आता १ जुलैपर्यंत, ट्रेन क्रमांक ०९६२१ अजमेर–वांद्रे टर्मिनस साप्ताहिक विशेष ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे.

ट्रेन क्रमांक ०४७१२ वांद्रे टर्मिनस–बिकानेर साप्ताहिक विशेष २७ जूनपर्यंत आणि ट्रेन क्रमांक ०४७११ बिकानेर–वांद्रे टर्मिनस साप्ताहिक स्पेशल २६ जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे. या तिन्ही विशेष गाड्यांचे आरक्षण भारतीय रेल्वेच्या सर्व आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसीच्या संकेस्थळावर सुरू करण्यात आले आहे.

# पनवेल तालुका पोलिसांची बैठक



**पनवेल :** तालुका पोलिसांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच सणासुदीच्या निमित्ताने पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, गोपनीय विभागाचे अधिकारी कुवर आदींनी त्यांच्या हद्दीतील विविध पदाधिकाऱ्यांची आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तसेच सणासुदीच्या निमित्ताने पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले, तसेच आचारसंहितेचे पालन करून सण व उत्सव साजरे करावेत, अशा सूचनासुद्धा दिल्या.

## दुखवटा

### पंढरीनाथ ठाकूर



**उरण :** तालुक्यातील खोपटे–धसाखोशी येथील निवृत्त मुख्याध्यापक पंढरीनाथ जानबा ठाकूर (८८) यांचे पनवेल, कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, तीन मुले, सुना आणि नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर खोपटे–धसाखोशी येथील स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. सांत्वनासाठी येणाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचा दुखावटा आणू नये, असे आवाहन त्यांचे चिरंजीव संजय ठाकूर यांनी केले आहे.

# लाईट बिल भरायला सांगून फसवणूक

## पनवेलमध्ये अनेकांना अनोळखी नंबरवरून मेसेज; सतर्क राहण्याचे आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**


ऑनलाईन लाईट बिल भरायला सांगून आर्थिक फसवणूक करण्याचा नवा फंडा वापरण्यात येत आहे. त्यामुळे आपल्या कोणाला जर कुठल्याही नंबर वरून जर असे मेसेज येत असतील तर आपण महावितरण (एमएसईबी) कार्यालयात संपर्क साधून खात्री करून आपले लाईट बिल भरा. कोणालाही ऑनलाईन पद्धतीने पैसे पाठवू नका सतर्क रहा नाहीतर आपली आर्थिक फसवणूक होऊ शकते, असे आवाहन माजी नगरसेवक व भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांनी केले आहे.

नवी मुंबई पनवेल परिसरात ऑनलाईन फसवणुकीचे नवीन नवीन प्रकार उघड केस येत आहेत सध्या महावितरण कडून वीज बिल वसुली सुरू असल्याने तुमच्या मोबाईलवर इलेक्ट्रिसिटी ऑफिस या नावाने मेसेज येत आहेत. त्यामध्ये दिलेल्या मोबाईल नंबरवर त्वरित पैसे भरा अथवा रात्री ९.३० वाजता कनेक्शन कट केले जाईल, असे सांगितले जात आहे यामध्ये पैसे भरल्यानंतर फसवणूक होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कोणीही अशा प्रकारे मेसेज आल्यावर ऑनलाईन पैसे




भरू नयेत .आपली आर्थिक फसवणूक होऊ शकते असे नितीन पाटील यांनी राम प्रहरशी बोलताना सांगितले.

याबाबत महावितरण चे असिस्टंट इंजिनियर मंदार सावंत यांच्या कडे चौकशी केली असता. त्यांनी इलेक्ट्रिसिटी ऑफिस अशा मोबाईल नंबर वरून महावितरण (एमएसईबी) कार्यालयातून लाईट बिल भरा असा कोणता मेसेज येत नाही. तरी आपल्या कोणाला जर कुठल्याही नंबर वरून जर असे मेसेज येत असतील तर आपण खात्री करण्यासाठी महावितरण




(एमएसईबी) कार्यालयात संपर्क साधून आपले लाईट बिल भरा, असे सांगितले आहे.

## वाहनाच्या धडकेने स्कूटीवरील चालकाचा मृत्यू

**पनवेल :** मुंबई–पुणे हायवेवरवरून जाणाऱ्या एका स्कूटीचालकास भोकरपाडा येथे अज्ञात वाहनाची धडक बसली. अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भूषण राजाराम कांबळे (वय ३९) असे या मृत्यू झालेल्या चालकाचे नाव आहे. हे त्याच्या ताब्यातील स्कूटी (एमएच ४६ बी.एस १०६०)ने जुन्या पुणे मुंबई हायवेने चौककडून पनवेलकडे जात होता. याचवेळी अज्ञात वाहनाच्या चालकाने पाठीमागून धडक दिली. तो वैद्यकीय मदत न देता व पोलिसांना खबर न देता पळून गेला म्हणून तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अल्पवयीन मुलीसोबत विवाह करणाऱ्या तरुणाला अटक

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण भागात राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणाने त्याच भागात राहणाऱ्या एका १५ वर्षीय मुलीशी मंदिरात विवाह केला. त्यानंतर अल्पवयीन मुलगी गर्भवती झाल्याचे उघड झाले आहे.

पीडित मुलीने रुग्णालयात मुलीला जन्म दिल्यानंतर डॉक्टरांनी याबाबतची माहिती उरण पोलिसांना दिली. त्यानंतर उरण पोलिसांनी पीडित मुलीशी विवाह करणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. या घटनेतील १५ वर्षीय पीडित मुलगी व तिच्याशी विवाह करणारा २१ वर्षीय तरुण हे दोघेही उरण परिसरात एकाच भागात राहण्यास आहेत.

वर्षभरापूर्वी या दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले होते, मात्र दोघांचेही वय कमी असल्याने मुलीच्या कुटुंबीयांनी त्यांच्यातील प्रेमसंबंधाला विरोध केला होता, मात्र त्यानंतरदेखील त्या दोघांनी आपल्या कुटुंबियांचा विरोध डावलून मंदिरात लग्न केले होते. त्यानंतर पीडित मुलगी गर्भवती राहिली होती. तिला प्रसववेदना होत असल्यामुळे ती चार दिवसांपूर्वी रुग्णालयात गेली होती. या वेळी पीडित मुलगी गर्भवती असल्याचे लक्षात आल्यानंतर डॉक्टरांनी उरण पोलिसांना याबाबतची माहिती दिली. उरण पोलिसांनी तरुणावर बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. न्यायालयाने तरुणाला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## लोकसभा निवडणुकीची पोलिसांकडूनही तयारी; पनवेल परिसरातील संवेदनशील भागात रूटमार्च

**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी पनवेल ते करंजाडे पोलीस चौकी असा रूट मार्च काढून पोलीस प्रशासन सतर्क असल्याचे दर्शन त्यांनी या वेळी घडविले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक आरपीएफ कंपनीचे एक अधिकारी, ३२ अंमलदार यांच्यासह पोलीस ठाण्याकडील दोन पोलीस निरीक्षक, सहा सहाय्यक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक व ४२ अंमलदार यांनी पोलीस ठाणे हद्दीतील महत्त्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परीसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाची ठिकाणे म्हणजेच पनवेल मनपा येथून सुरू मुसलमान मोहल्ला, मिरची गल्ली नाका, टपाल नाका, उरण नाका, मच्छी मार्केट, वडघर, करंजाडे सेक्टर १, २, ३, ४ आणि सेक्टर ५ करंजाडे चौकी येथे समाप्त करण्यात आली. या रूट मार्चमध्ये सहा वाहनांसह पायी भेटी देऊन त्यांना परीसर व परीस्थितीची माहिती देण्यात आली.





पनवेल : महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट सेनेचे पनवेल महानगरप्रमुख गणेश सरवणकर आणि शेतकरी कामगार पक्षाचे युवक पदाधिकारी आदित्य हरिश्चंद्र शेळके, सुरज सवदे यांनी रविवारी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी या पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

## न्हावे गाव अध्यक्षपदी गजानन म्हात्रे, तर खजिनदारपदी विनोद पाटील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील न्हावे गाव कमिटीच्या वतीने अध्यक्षपदी गजानन म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. तर खजिनदारपदाची धुरा विनोद म्हात्रे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या बद्दल त्यांचे कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच राजेश म्हात्रे, माजी उपसरपंच किसन पाटील, भाजप अध्यक्ष तुषार भोईर, ग्रामंपचायत सदस्य शैलेश पाटील, भाजप कार्यकर्ते चंद्रकांत पाटील, मोरेश्वर पाटील, चंद्रकांत जनार्दन पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## जागतिक आरोग्यदिनानिमित्त आरोग्यम खारघर कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून कोकण दर्पण मीडिया ग्रुपच्या माध्यमातून ७ एप्रिल २०२४ रोजी आरोग्यम खारघर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. खारघर सेक्टर १२ येथील उत्कर्ष हॉलमध्ये सकाळी ९.३० मिनिटांनी हा कार्यक्रम होणार आहे. या आरोग्य कार्यशाळेत खारघर, पनवेल, नवी मुंबई शहरातील अनेक नामांकित डॉक्टर्स उपस्थित राहणार आहेत. आपल्या आरोग्यविषयीचे प्रश्न आपणास थेट विचारता येणार आहेत.

खारघर येथे आयोजित केलेल्या आरोग्यम खारघर कार्यशाळेचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, ज्येष्ठ हृदयरोग तज्ज्ञ तथा शुश्रूषा हार्ट केअर ग्रुपचे मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय तारळेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार आहे.

या आरोग्य कार्यशाळेत ऑर्थोपेडिक सर्जन तथा खारघर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर डॉ. सरबजीत कोहली, बालरोग तज्ज्ञ तथा सान्वी चाईल्ड हॉस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर डॉ. सतीश शहाणे, स्त्रीरोग तज्ज्ञ तथा ओर्नेट हॉस्पिटलच्या मेडिकल डायरेक्टर डॉ. शुभांगी अदाटे, एचसीएएच केअर सेंटरचे कन्सलटन्ट फिजिशियन मेडिसिन ॲण्ड रिहॅबिलेशन डॉ. आस्तिक भट्ट, अमृतवेल आयुर्वेदच्या संचालिका तथा आयुर्वेदाचार्या डॉ. ज्योती जाधव, प्लास्टिक सर्जन तथा आर एन हेल्थ सेंटरच्या डायरेक्टर डॉ. रीदिमा सचदेवा नागरिकांना आरोग्याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

आरोग्यम खारघर कार्यक्रमासाठी कोकण रहिवाशी संघ आणि उत्कर्ष हॉलचे संचालक शशिकांत जाधव प्रमुख संयोजक आहेत. मराठा समाज खारघर, श्रीपुष्प फाउंडेशन, वसंतराव चॅरिटेबल ट्रस्ट, कमलज्योती फाउंडेशन, अटल फाउंडेशन, शाश्वत फाउंडेशन, खारघरचा राजा. राष्ट्रसेवक, संवाद मंच, खान्देश विकास फाउंडेशन, सुराज्य फाउंडेशन, शिवबंधन प्रतिष्ठाण, शुभारंभ सामाजिक संस्था, युवा प्रेरणा सामाजिक संस्था, श्री साई गणेश मंडळ या खारघरमधील सामाजिक संघटनांनी सहभाग दर्शविला आहे. खारघरवासियांमध्ये आरोग्याविषयी जागृती करण्यासाठी आयोजित केलेल्या आरोग्यम खारघर या आरोग्य कार्यशाळेमध्ये खारघरवासियांनी सहकुटुंबीय मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण दर्पणचे संपादक संजय महाडिक यांनी केले आहे.

## ग्रामीण भागात पापड करण्याची लगबग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने खारवड्या, कुरडई, पापड, बटाटा वेफर्स, शेवया आदी उन्हाळ्यात बनवल्या जाणाऱ्या पदार्थांची लगबग ग्रामीण भागातील महिलांमध्ये दिसत आहे. मध्यंतरी बदलत्या हवामानामुळे कधी थंडी; तर कधी पाऊस व ढगाळ वातावरणामुळे हे पदार्थ बनवण्यास अडचणी निर्माण होत होत्या. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून यासाठी पापड बनवण्याची लगबग ग्रामीण महिलांमध्ये दिसत आहे.

कृषिप्रधान देशात खारवडी, कुरडई, बटाटा वेफर्स, शेवया, पापड हे पदार्थ खास प्रक्रिया करून भारतीय पद्धतीनुसार करून सुकवून ते पुढे वर्षभर वेगवेगळ्या सणावारांना खाण्याची प्रथा



आहे. खारवाडी, कुरडई हे कुरकुरीत करण्याची पद्धत ही कष्टदायी व मेहनतीची आहे. त्यासाठी दोन दिवस तांदूळ भिजत ठेवणे, ओले तांदूळ करून सुकवणे, नंतर ते दळून पीठ तयार केले जाते. तयार झालेले पीठ शिजवून घेऊन सकाळी सकाळीच पातळ पीठ अंगणात प्लास्टिक अंथरून त्यावर चमचाच्या सहायाने टाकून सुकवण्यात येतात.

कुरडई साच्याच्या सहायाने टाकून सुकल्यानंतर वर्षभरासाठी साठवून ठेवण्यात येतात. अशाच पद्धतीने गव्हाच्या पिठाच्या शेवया, उडीद पापड, ज्वारी, नांगली, तांदूळ, साबुदाणा यांचेही पापड तयार होतात.

## ऊसाच्या रसाला मागणी वाढली

**उरण : वार्ताहर**

वातावरणात उष्णतेचे प्रमाण वाढल्याने शरीराला थंडावा मिळण्यासाठी प्रत्येक नागरिक वेगवेगळे शीत पेये पितात. त्यात ताक, कोल्ड्रीन, नारळ पाणी, लस्सी पितात तर कुणी ऊसाचा रस पिणे पसंत करतात. उन्हाचा तडाखा वाढला आहे. त्यामुळे अनेक जण शरीराला थंडावा मिळण्यासाठी गुणकारी अशा ऊसाचा रस पिण्याला महत्त्व देत आहेत.

सध्या शहरामध्ये ऊसाच्या रसाची गाडीही फिरत असल्याने नागरिकांना दारातच ताजातवाना अशा ऊसाच्या रसाचा आस्वाद घेता येत आहे. उन्हामुळे नागरिकांच्या घशाला कोरड पडू लागली आहे. त्यामुळे तहान भागविण्यासाठी



नागरिकांचे पाय उसाचा रस व बर्फखरेदीकडे वळत आहेत. उन्हाच्या वाढत्या दाहकतेमुळे शहारात रस्त्याच्याकडेला रसवंतीगृहे गर्दीने फुलली आहेत. उष्णतेने शरीरातील पाणी कमी होते. त्यामुळे थकवा जाणवतो. अशा वेळी उसाचा ताजा रस प्यायल्याने सगळा थकवा दूर होतो. त्यामुळे ऊसाचा रस – पिण्यासाठीही नागरिक गर्दी करीत आहेत.

साच्या रसाचे विविध फायदे आहेत. ऊसाचा रस पिल्याने शरीराल थंडावा मिळतो, आरोग्यासाठी फायदेशीर ऊसाचा रस आहे. कावीळ झालेल्या व्यक्तीस ऊसाचा रस फायदेशीर ठरतो. एनर्जी म्हणून काम करते. रोग प्रतीकारक शक्ती वाढविते.

रसामध्ये कॅल्शियम, माग्निशियाम, आयर्न भरपूर प्रमाणात असते. शरीरातील पाण्याची कमरता भरून निघते. कावीळ झालेल्या व्यक्तीस उसाचा रस उपयुक्त असून पचन सुधारते. अत्यंत गुणकारी असल्याने उसाचा रस पिणे पसंत करतात. त्यामुळे उसाच्या रसाला मागणी वाढली आहे.

उरण शहरात ठिकठिकाणी ऊसाचा रस विकणारे ठिकाणे आहेत. त्यात लाल मैदान जवळ, उरण चारफाटा वाणी आली समोर, पेंशनर पार्क, कोट नाका, बोकडवीरा जवळील शेवा पोलीस चौकीजवळ आदी ठिकाणी दुकाने थाटण्यात आली आहेत.

उरण शहरातील लाल मैदान (वीर सावरकर मैदान जवळ) असलेल्या अमृत सोंडकर यांचे असलेले नवनाथ रसवंती गृह येथे विलास फदाले व त्यांची पत्नी शशिकला फदाले हे उसाचा रस विक्रेते धंदा करीत आहेत. १९६० सालापासून आजपर्यंत गेली ७४ वर्षापासून ऊसाचा रस विक्री करण्याचे सुरू आहे, असे नवनाथ रसवंती गृहाचे मालक अमृत सोंडकर यांनी सांगितले.

## संपादकीय

# उद्धव ठाकरेंची मळमळ

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे सत्तेवाचून अक्षरशः तडफडत आहेत. शिवसेनेत उठाव होऊन सत्ता गेली, पक्षनाव व चिन्हही गेले. अशातच नेतेदेखील साथ सोडून जात असल्याने उद्धव ठाकरेंना नैराश्य आले असून आता तर पराभव समोर दिसत असल्याने ते सैरभर झाले आहेत.

**देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यासाठी सर्वच पक्ष आपापले उमेदवार जाहीर करीत आहेत. यामध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने आघाडी घेत प्रचारही सुरू केला आहे. यंदा भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हॅट्ट्रिकसह चारशे पार जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. त्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू आहे. वास्तविक, आपल्या देशात लोकशाही आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे, मात्र निवडणुकीत भाजपपुढे आपला टिकाव लागणार नाही याची जाणीव झाल्याने विरोधक भाजपवर आरोप, टीका करीत आहेत. यापैकीच एक म्हणजे उद्धव ठाकरे. हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना आणि पक्षाच्या ध्येय-धोरणांना तिलांजली देऊन काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत हातमिळवणी करून ते मुख्यमंत्री बनले होते. खरंतर निवडणुकीत भाजप व शिवसेना अशी युती होती. त्यामुळे या दोन पक्षांनी सत्ता स्थापन करणे अपेक्षित होते, मात्र भाजपला बहुमत न मिळाल्याने ठाकरे अडीच वर्ष मुख्यमंत्रिपदावर अडून बसले आणि भाजपने हा प्रस्ताव नाकारल्यावर त्यांनी थेट विरोधकांशी सलगी करून आपली राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण केली. स्वार्थ व सत्तेसाठी मिळविलेले मुख्यमंत्रीपद व सत्ता त्यांच्याच पक्षातील नेत्यांनी उलथवून लावत भाजपसोबत नवे सरकार स्थापन केले. तेव्हापासून उद्धव ठाकरे अस्वस्थ आहेत. अधूनमधून त्यांची अस्वस्थता बाहेर पडत असते. सध्या महाराष्ट्रासह देशात लोकसभेचा रणसंग्राम सुरू आहे. यामध्ये भाजपला मतदारांचा वाढता प्रतिसाद लाभत असल्याने उद्धव ठाकरेंना नैराश्य आल्याचे दिसते. त्यांनी देशाची राजधानी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन भाजपवर बेछूट आरोप केले. मुळात त्यांना अशा प्रकारे आरोप करण्याचा अधिकारच नाही, कारण उलट ठाकरे सरकारच्या काळात राज्यात तसेच मुंबई महापालिकेत त्यांचा पक्ष सत्तेत असताना अनेक घोटाळे, भ्रष्टाचार झालेले आहेत. यातील काही यापूर्वीच उघड झाले आहेत, तर काही हळूहळू समोर येत आहेत. त्यामुळे आपले हात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या काळे झाले असताना दुसऱ्यावर आरोप करण्यात काय मतलब? बहुधा त्यांना आपले भवितव्य अंध:कारमय दिसत असावे. उद्या इतर काही पक्षांच्या नेत्यांप्रमाणे आपल्यावरही कारवाही होऊ शकते याचा त्यांना अंदाज आला असावा. शिवाय लोकसभा निवडणुकीत भाजपपुढे आपला निभाव लागणार नाही याचीही उद्धव ठाकरेंना कल्पना आली असेल. तरीही उसना आव आणून ते लढत आहेत आणि उरलेसुरलेले नेते सोडून जाऊ नये व निवडणुकीत उभे केलेल्या उमेदवारांचा मानहानीकारक पराभव होऊ नये म्हणून त्यांचा हा सारा अट्टाहास दिसतो, परंतु असे करून पुढे जे काही होणार आहे ते काही ठाकरे टाळू शकणार नाही. म्हणून त्यांनी असे काही बरळण्यापेक्षा आपला पक्ष व स्वत:चे अस्तित्व कसे टिकेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या सल्लागारांनीही त्यांच्या हे ध्यानात आणून दिले पाहिजे. अन्यथा या पक्षाची वाताहत तर झालेलीच आहे. येत्या काळात राहिलेली इभ्रतही जाण्यास वेळ लागणार नाही. तेव्हा उद्धव ठाकरेंनी इतरांविरोधात बोलताना विचार करावा.**

# कर्जतमधील शंभर वर्षांपासूनचा मिरची बाजार



**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत बटाटावडा, पावसाळी पर्यटनासाठी धबधब्यांचे गाव आणि आता कर्जत शिक्षण पंढरीकडे वाटचाल करतेय त्याचबरोबर कर्जत मिरची बाजारासाठीही प्रसिद्ध आहे. रायगडच नव्हे तर ठाणे, पुणे, मुंबईहूनसुद्धा या बाजारात वर्षानुवर्षे ग्राहक येतात आणि आपल्या आवडीची मिरची व खडे मसाले खरेदी करतात. विशेष म्हणजे परदेशात असलेल्या आपल्या नातेवाईकांनासुद्धा कर्जतची मिरची घेऊन तयार मसाला पाठवणारांची संख्याही लक्षणीय आहे. या मिरची बाजाराला शंभर वर्षे होत आली आहेत. गेल्या वर्षी ग्राहकांना मिरचीचा जोरदार ठसका बसला होता, मात्र यंदा मिरचीचे दर आवाक्यात असल्याने गृहिणींनी मिरची खरेदी करताना हात सैल सोडला आहे.

सुमारे नव्वद - पंचांणव वर्षांपासून कर्जतचा मिरची बाजार भरतोय. महावीर पेठेत १० - १२ दुकानांमध्ये मिरची व खडे मसाले विक्रीसाठी असतात. ही मिरची हैदराबाद - वारंगल, आंध्रप्रदेश - गंटूर, तेलंगणा आदी राज्यातून पुण्यात येते आणि तेथून ती कर्जतच्या बाजारात उपलब्ध होते. हल्ली तयार मसाले मिळत असले तरी पहिल्यापासून ज्यांना कर्जतच्या मसाल्याची सवय आहे ते वर्षभरासाठी मसाला करण्यासाठी कर्जतची बाजारपेठ गाठतात. तसेच ग्रामीण भागात लग्न सोहळ्यासाठी भोजनाचा आस्वाद चांगला चाखायला मिळावा म्हणून वीस ते पंचवीस किलो मसाला करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. खरा हा बाजार चार ते पाच महिनेच असतो आणि सुमारे दोन कोटी रुपयांची उलाढाल होत असते.

जानेवारी ते मे या कालावधीत ही मिरची विकत घेण्यासाठी अगदी पेण, अलिबाग, पनवेल, बदलापूर, कल्याण, डोंबिवली, मुरबाड, शहापूर, लोणावळा, पुणे येथूनच नव्हे तर मुंबईतूनही ग्राहक येत असतात. परदेशातही आपल्या नातेवाईकांना कर्जत मधून मिरची घेऊन मसाला तयार करून पाठवण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे. यंदा किमती बऱ्या पैकी असल्याने मिरची घेण्यासाठी मिरची व खडे मसाले घेण्यासाठी बहुतांश दुकानात ग्राहकांची गर्दी दिसते. मिरची सहा-सात प्रकारची असते. जयंतीलाल परमार, मदन परमार, शिवलाल गुप्ता हे तीन-चार पिढ्यांपासून हा मिरचीचा व्यापार करतात. काही छोटे व्यावसायिक हातगाडीवरही हा व्यवसाय करतात. हा व्यवसाय हंगामात दोन कोटी रुपयांपर्यंत जातो.

कर्जतमध्ये मसाला दळण्याच्या मोजक्याच गिरण्या आहेत. तर तीन-चार ठिकाणी दणकी पद्धतीने मसाला कुटून दिला जातो. या पद्धतीच्या मसाल्याला चांगली चव असते. दहिवली, आमराई आणि दाहिवली मध्ये या प्रकारच्या दणक्या आहेत. कर्जत व भिसेगाव येथे दगडेंची मसाला गिरणी प्रसिद्ध आहे. तर गुप्ता बंधूंची गिरणीसुद्धा बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. वांजळे व सावरगाव याच्या मधोमध ठाकरे यांची मसाला गिरणी आहे. कडावमध्ये सुध्धा चांगल्या प्रकारे मिरची दळून दिली जाते. त्या भागातील ग्रामस्थ तेथे मिरची, धणे, हळद करुन घेतात. काही मोक्याच्या गावात उदारणार्थ नेरळ, कशेळे, कळंब आदी ठिकाणी सुद्धा मसाला गिरणी आहेत तर छोट्या गावांमध्येसुद्धा मिरची दळून दिली जाते.

यंदा मिरचीचे दर आवाक्यात असल्याने अनेक गृहिणींनी मिरची विकत घेताना काटकसर केली आहे. खड्या मसाल्याचे दर स्थिर असल्याने गृहिणींनी हात सैल सोडला आहे. दररोज जेवणात मसाला वापरावा लागत असल्याने गेल्या वर्षी नाईलाजाने मिरची खरेदी करण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. गेल्या वर्षी मिरचीच्या दरामुळे गृहिणींचे आर्थिक गणित कोलमडले होते. यंदा मिरचीचे दर कमी झाल्याने व्यापारी वर्गाचा व्यवसाय चांगला होत आहे, असे व्यापारी वर्गाचे म्हणणे आहे.

### मिरची प्रति किलो दर



| | गत वर्षी | यंदा |
|---|---|---|
| गंटूर मिरची | २८० रुपये | २४० रुपये |
| लवंगी मिरची | २८० रुपये | २२० ते २५० रुपये |
| बेडगी मिरची | ७०० रुपये | ३५० ते ४५० रुपये |
| काश्मिरी मिरची | ८०० रुपये | ३५० ते ५५० रुपये |
| संकेश्वरी मिरची | ४४० रुपये | २५० ते ४४० रुपये |
| पट्टी मिरची | ४०० रुपये | ३२० रुपये |

### खडे मसाले प्रति किलो दर

**गेल्या वर्षीचे व यंदाचे दर सारखेच आहेत**


| | |
|---|---|
| धणे | १८० ते २०० रुपये |
| हळद | १२० ते १८० रुपये |
| बडीशेप | २८० रुपये |
| दालचिनी | ४०० रुपये |
| लवंग | ८०० रुपये |
| काळीमिरी | ८०० रुपये |
| जावंत्री | २८०० रुपये |
| नाकेश्वर | २४०० रुपये |



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅप चॅटिंगसाठी नंबर सेव्ह करण्याची गरज नाही!

आपल्याला बरेचदा एखादा छोट्याश्या कामासाठी चॅटिंग करणे आवश्यक असते. तेव्हा बऱ्याचदा नको असलेले कॉन्टॅक्ट नंबर सेव्ह करावे लागतात. अशा कॉन्टॅक्टची भविष्यात काही गरज नसते, परंतु कॉन्टॅक्ट नंबर सेव्ह न करता चॅटिंगही करता येत नाही. अशावेळी व्हॉट्सअ‍ॅपमधील एक फायदेशीर ट्रिक वापरता येते.





व्हॉट्सअ‍ॅपवर असे अनेक फीचर्स आहेत ज्याबद्दल युजर्सना माहिती नसते. आज तुम्हाला अशाच एका फीचरबद्दल आम्ही सांगणार आहोत. या फीचरचा वापर करून तुम्ही कोणाचाही नंबर सेव्ह न करता चॅट करू शकता. खरंतर नंबर सेव्ह केला तरच तो चॅटमध्ये दिसतो, परंतु आम्ही जी पद्धत सांगणार आहोत ती खूप वेगळी आहे आणि यामुळे तुमचा वेळ वाचू शकतो.

जर तुम्हाला व्हॉट्सअ‍ॅपवर कोणत्याही युजरचा नंबर सेव्ह करायचा नसेल तर आता तुम्हाला काही सोप्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील आणि त्यानंतर तुम्ही कोणत्याही यूजरशी चॅट करू शकता. तुम्ही पुढील ट्रिक वापरू शकता.

स्मार्टफोनच्या कॉन्टॅक्ट अ‍ॅपवर तुम्हाला ज्या युजरशी बोलायचे आहे त्याचा नंबर डायल करावा लागेल. त्यानंतर आता तुम्हाला युजरचा नंबर टच अँड होल्ड करून कॉपी करा. मग व्हॉट्सअ‍ॅप ओपन करा आणि नवीन चॅट सुरू करण्यासाठी + आयकॉनवर टॅप करा. सर्च विंडोमध्ये 'you' टाइप करा म्हणजे तुमचा नंबर दिसू लागेल. तुमचं स्वतःच चॅट ओपन करा आणि आता तो नंबर स्वतः ला पाठवा. नंबर पाठवल्यानंतर नंबरवर सिंगल टॅप करावे लागेल. समोर पॉप-अ‍ॅप विंडो उघडेल. इथे तुम्हाला चॅट किंवा कॉलचा पर्याय दिला जाईल. यामध्ये तुम्ही तुमच्या गरजेनुसार टॅप करू शकता. तुम्ही यापैकी कोणत्याही एका पर्यायावर टॅप करताच, तुम्ही युजरच्या व्हॉट्सअ‍ॅप चॅट पेजवर पोहचाल.

Google Play Beta प्रोग्राम अंतर्गत व्हॉट्सअ‍ॅपद्वारे नवीन अपडेट आणले जात आहे. यासाठी नवीन आवृत्ती २.२४.७.६ अपडेट देण्यात येत आहे. व्हॉट्सअ‍ॅपच्या नवीन अपडेटमध्ये युजर्स त्यांच्या स्टेटसवर १ मिनिटापर्यंतचे व्हिडिओ शेअर करू शकतील. सध्या हे काही बीटा टेस्टर्सना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

# 'आरएसएस'चे संस्थापक डॉ. केशव हेडगेवार



**निमित्त**

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म १ एप्रिल १८८९मध्ये एका गरीब ब्राम्हण कुटुंबात झाला. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक आहेत. त्यांनी लावलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे.

हेडगेवार लहानपणापासूनच क्रांतीकारी विचाराचे होते. त्यांच्या लहानपणीची एक गोष्ट अशी की, ते जेव्हा शाळेत शिकत होते, तेव्हा त्या शाळेची तपासणी करण्यासाठी एक इंग्रजी अधिकारी आला होता. हेडगेवार यांनी त्या वयात त्या अधिकाऱ्याच्या शाळा तपासणीला विरोध केला. तसेच आपल्या काही मित्रांना एकत्र करत अधिकाऱ्याविरोधात भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. हेडगेवारांचे शिक्षण त्यांच्या मोठ्या भावाने केले. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर, इ.स. १९१० साली ते वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी कोलकत्त्याला गेले. तरुणपणात त्यांनी सशस्त्र क्रांतीत सहभाग घेतला होता. शाळेत असताना त्यांनी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वाटण्यात आलेली मिठाई रागाने फेकून दिली होती. तसेच पुढे 'वंदे मातरम'चा घोष केल्याबद्दल त्यांना शाळेतून काढून देखील टाकण्यात आले होते.

बंगालमधील प्रत्यक्ष क्रांतिकार्यात सहभाग घेता यावा यासाठी त्यांनी आपले उच्चशिक्षण जाणीवपूर्वक कोलकातामध्ये पूर्ण केले. तेथे ते अनुशीलन समिती या क्रांतिकारी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते बनले. पुढे त्यांनी १९२५ साली दसरा अर्थात विजयादशमीच्या दिवशी संघाच्या पहिल्या शाखेची स्थापना केली. डॉक्टरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला एक वेगळे तत्त्वज्ञान व वेगळ्या प्रकारची कार्यपद्धती दिली. त्या पायावरच रा. स्व. संघ हा गेली अनेक वर्षे यशस्वीरीत्या कार्यरत आहे. क्रांतिकार्यातील आपले जुने सहकारी सोबत घेऊन त्यांनी नागपुरात एका पडक्या वाड्यात संघाची पहिली शाखा सुरू केली. चारित्र्यसंपन्न व्यक्तिनिर्माण व त्या आधारावर राष्ट्रनिर्माण या अंतिम ध्येयाचा विचार त्यांनी संघस्थापनेच्या माध्यमातून केला. डॉ. हेडगेवार हे कुशल संघटक, मार्गदर्शक व नेते होते. त्यांच्याच प्रेरणादायी नेतृत्वामुळे गोळवलकर गुरूजी, बाळासाहेब देवरस, भैय्याजी दाणी, एकनाथजी रानडे, पं. दीनदयाळ उपाध्याय यासारखे नेते, कार्यकर्ते देशाला मिळाले. १९२५ म्हणजेच संघाच्या स्थापनेपासून ते १९४० त्यांच्या मृत्यूपर्यंत असे पंधरा वर्ष डॉक्टर हेडगेवार सतत देशभर भ्रमण करत होते. त्यांनी संघाच्या माध्यमातून एक-एक माणूस जोडण्याचे कार्य केले. त्यांच्या कष्टाचे फळ म्हणजे आज संघाचा महाकाय वटवृक्ष झाला आहे. लाखो कार्यकर्ते आज संघासाठी काम करत आहे.

सच्चे नेतृत्व, त्याग, सेवा, समर्पण भावना, दूरदर्शी विचार आणि शिस्तबद्ध, निश्चल व व्रतस्थ कार्यजीवनशैली ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध अंगे होती. २१ जून, इ.स. १९४० साली डॉक्टरांचे निधन झाले. त्यापूर्वी एक वर्ष आधी त्यांनी संघाच्या कार्यपद्धतीबाबत संघस्वयंसेवकांसाठी काही निर्देश देऊन ठेवले. संघाची निश्चित अशी कार्यपद्धती तयार झाली. आपल्या पश्चात संघटनेला ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असलेली शिदोरीच जणू त्यांनी संघाला अर्पण केली.

**हेडगेवारांवरील मराठी पुस्तके**

गोष्टीरूप हेडगेवार, मला उमगलेले डॉक्टर हेडगेवार, युगप्रवर्तक डॉ. हेडगेवार, डॉ. हेडगेवार. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**



**सातारा : कोयना नदी व सोळशी नदीचा तापोळा येथे संगम होऊन ती पुढे कोयना धरणात सामावते. शिवसागर जलाशय या नावानेही ती ओळखली जाते.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्याच्या सिजनमध्ये केळी खाण्याचे फायदे



वर्षाचे बारा महिने बाजारात उपलब्ध असलेले आणि सर्वाधिक विकले जाणारे फळ म्हणजे केळी. पण तुम्हाला माहीत आहे का की हे साधे दिसणारे फळ केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. या ऋतूमध्ये केळीचे सेवन केल्याने अनेक आजारांपासून दूर राहता येते. मॅग्नेशियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन बी६ आणि इतर अनेक पोषक तत्वे केळीमध्ये आढळतात जे पचन आणि हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात. केळी खाल्ल्याने तुमच्या आरोग्यासाठी कोणते फायदे होतात ते जाणून घेऊया.

पचनक्रिया सुधारते : उन्हाळ्यात लोकांना पचनाच्या समस्या येतात. अशा स्थितीत या ऋतूत केळीचे सेवन केल्यास पचनक्रिया चांगली राहते. पचनक्रिया सुधारून तुम्ही अनेक गंभीर आजारांना बळी पडण्यापासून वाचता. त्यामुळे रोज केळीचे सेवन करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

लूज मोशनमध्ये फायदेशीर : या ऋतूत उष्णतेमुळे लोकांना लूज मोशनचा त्रासही होतो. अशा परिस्थितीत केळीचे सेवन केल्याने त्यांना तात्काळ आराम मिळू शकतो. काळे मीठ मिसळून केळी खाल्ल्यास आराम मिळेल. यासोबतच केळीसोबत साखरेचे काही दाणे खाल्ल्यानेही तुम्हाला फायदा होईल.

रक्त पातळ ठेवते : केळी शरीरातील रक्त पातळ ठेवण्यास मदत करते. केळी रक्ताभिसरण देखील सुधारते. केळ्यामध्ये मॅग्नेशियम असते ज्यामुळे रक्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते. कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी झाले की रक्तवाहिन्यांमधील रक्ताभिसरणही सुरळीत होते.

बद्धकोष्ठतेमध्ये फायदेशीर : केळीचे सेवन बद्धकोष्ठतेच्या रुग्णांसाठी संजीवनी औषधी वनस्पतीसारखे आहे. याचे सेवन केल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळेल. यासाठी केळीसोबत दूध प्या. रोज रात्री झोपण्यापूर्वी याचे सेवन केल्यास बद्धकोष्ठतेवर फायदा होतो.

# महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणायचेय -सुधाकर घारे

## कर्जतमध्ये कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

आता लोकसभेची निवडणूक आहे. आता कोणत्याही परिस्थितीत आपले महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना आपल्या मतदारसंघातून जास्तीत जास्त मतांचे मताधिक्य द्यायचे आहे तसेच रायगड लोकसभा मतदारसंघात आपले सुनील तटकरे उमेदवार आहेत. तेथेही त्यांना जमेल तशी मतांची मदत करायची आहे, असे प्रतिपादन राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात दर रविवारी सुरू असलेल्या पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रदेश उपाध्यक्ष शरद कदम, खालापूर तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, अशोक सावंत, खालापूर तालुका महिला अध्यक्ष प्राची पाटील, कर्जत तालुका महिला अध्यक्ष ॲड. रंजना धुळे, बाबू पोटे, अमोल पाटील, संतोष गुरव, इब्राहिम करंजीकर, विश्वनाथ पाटील, विधानसभा अध्यक्ष बळीराम देशमुख, तालुका युवक अध्यक्ष ॲड. स्वप्नील पालकर, राम कोळंबे, प्रमोद देशमुख, रवींद्र घारे, युवक शहर अध्यक्ष सोमनाथ पालकर, अतुल कडू, मंगल ऐनकर, विलास माळी आदी उपस्थित होते.




ते पुढे म्हणाले, कार्यकर्ता म्हणजे आमचे काळीज आहे. खरे तर कार्यकर्ता पाठीचा कणा आहे. त्यांच्यामुळेच आम्ही या व्यासपीठावर आहोत. त्यांना सक्षम करणे आमचे काम आहे. एखाद्या वेळेस सुखाच्या वेळी आम्ही वेळ नसला तर येणार नाही, परंतु दुःखाच्या वेळी कोणत्याही परिस्थितीत येऊन कार्यकर्त्यांच्या पाठीशी राहू, असा शब्द दिला.

तालुका महिलाध्यक्ष ॲड. रंजना धुळे यांनी प्रास्ताविक करताना, महिला व तरुणांना ज्यांच्याबद्दल विश्वास आहे, त्या योग्य माणसाबरोबर आपण राहिले पाहिजे, असे स्पष्टपणे सांगितले. तौसिफ करंजीकर यांनी, कार्यकर्त्यांचा या पक्षावर व नेत्यांवर विश्वास आहे म्हणून आमच्या परिसरातील कार्यकर्ते पक्षप्रवेश करीत आहेत, असा दावा केला. अमोल पाटील, सुरेखा खेडकर, राजाभाऊ कोठारी, खालापूर तालुका महिलाध्यक्ष प्राची पाटील, तालुकाध्यक्ष संतोष पाटील यांनीही मार्गदर्शन केले.

यानंतर खालापूर व कर्जत तालुक्यातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले, तसेच नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रेसुद्धा देण्यात आली.

# कर्जत भालिवडी येथे वाहन कालव्यात कोसळले

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील भालिवडी टाटा रोड रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण अशी कामे सुरू आहेत. त्या रस्त्याच्या बाजूने कालवा जात असून त्या ठिकाणी त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे तेथून जाणारे चारचाकी वाहन थेट नाल्यात कोसळले आणि त्या वेळी दैव बलवत्तर म्हणून गाडीमधील प्रवासी वाचले आहेत.

कर्जत-मुरबाड रस्त्यावरून कडाव गावानजिक टाटा कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरणाची कामे सुरू आहेत. त्या रस्त्याच्या बाजूला राजनाला कालवा जात असून सध्या तेथील नाल्यावर कोणत्याही प्रकारचे प्रतिबंधक फलक लावण्यात आलेले नाही. शनिवारी रात्रीच्या वेळी पनवेलवरून भालिवडीला कार्यक्रमाकरिता जाणारे अशोक पवार आणि त्यांच्या पत्नी, सासू, सासरे इको कारमधून जात होते. टाटा रोडचे काम सुरू असल्याने जुने भवानी माता मंदिरच्या मागून नाल्याला लागून रस्ता बनविला जात आहे. त्या वळणावर नाल्याच्या किनाऱ्याला संरक्षक भिंत नसल्याने समोरून येणाऱ्या वाहनाची लाईट डोळ्यावर येऊन ही कार नाल्याच्या उतारावर जाऊन हॅन्ड ब्रेक लावून चालकाने गाडी थांबवली.

**सुदैवाने प्रवासी बचावले**



गाडीच्या काचा बंद असल्याने गाडी कलंडलेल्या स्थितीत असताना प्रवासी बाहेर येऊ शकत नव्हते. त्या वेळी तेथूनच प्रवास करणारे चोचीची वाडी गावचे योगेश देशमुख यांनी त्वरित मदतीसाठी आवाज दिला. चेतन पवाळी आणि त्यांचे मित्र यांनी गाडी थांबवत चालकाच्या मदतीने दरवाजे उघडून प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली.

# आंबेवाडी ते निवी कालव्याची उर्वरित दुरुस्ती लवकरच

## प्रशासनाचे आंदोलकांना आश्वासन



**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड पाटबंधारेच्या आंबेवाडी ते निवी कालवा दुरूस्तीची अनेक कामे मार्गी लागली. उर्वरीत दुरूस्तीची कामेही तातडीने केली जाणार आहे, पाणी सोडण्याचे नियोजन आहे. त्यामुळे आंदोलन तूर्तास मागे घ्या, अशी विनंती सर्वच प्रशासनाने केल्याने प्रस्तावीत आत्मदहन आंदोलन तूर्तास स्थगित करीत असल्याची घोषणा अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी रविवारी (दि. ३१) केली.

डोंगराचा उतार असल्याने दर पावसाळ्यात आंबेवाडी ते निवी कालव्याची प्रचंड हानी होते. कालव्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांनी लढा सुरू केला. यानंतर अनेक दुरूस्तीची कामे मार्गी लागली. उर्वरित दुरूस्तीच्या मागणीसाठी बळीराजा फाउंडेशनने कोलाड धरणात आंदोलनाचा इशारा दिला होता. पाटबंधारे विभागाने पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन उर्वरीत दुरूस्ती कामे महिन्याभरात तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आली. बैठकीत तळाघर हद्दीतील महत्त्वाच्या सायपन काही मोऱ्या दुरूस्तीचे कामे वेगाने पूर्ण करण्याचे ठरले.

कालव्याची दुरूस्ती तातडीने उरकून मे पूर्वार्धात पाणी सोडण्याचे नियोजन केल्याचे पत्र आंदोलनकर्त्यांना दिले. त्याबाबतची बैठक कोलाड पोलीस ठाण्यात झाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# मुस्लिम समाज खासदार सुनील तटकरेंच्या पाठीशी

## राष्ट्रवादी सरचिटणीस सुकुमार तोंडलेकर यांचा दावा

**मुरूड : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन, माणगाव, रोहा, तळासह विविध तालुक्यांना निधी देऊन तो भाग प्रगतशील बनवून लोकांना मूलभूत सुविधा दिल्या आहेत. विकासाच्या मुद्यावरच मुस्लिम समजासह इतर समाजसुद्धा खासदार तटकरे यांनाच मतदान करतील, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस सुकुमार तोंडलेकर यांनी व्यक्त केला आहे.

आगामी होणाऱ्या निवडणुकीविषयी आपले मत मांडताना सुकुमार तोंडलेकर पत्रकारांशी संवाद साधत होते. या वेळी त्यांच्यासमवेत माजी उपसरपंच नंदकिशोर भाटकर, ग्रामपंचायत सदस्य सुजित सिंसदकर, राकेश शिरवतकर, मनोहर परकर, राकेश खरोलीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी तोंडलेकर म्हणाले की, श्रीवर्धन मतदार संघ हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. येथून सर्वाधिक मताधिक्क्य सुनील तटकरे यांनाच मिळणार आहे. सुनील तटकरे यांच्या कामाची पद्धत, लोकांचे प्रश्न तातडीने सोडवणे, विकासकामांचा वेग या सर्व बाजू जनता मतदार राजा चांगला ओळखून असून मतदारराजा उत्कृष्ठ उमेदवाराचीच निवड करणार, असासुद्धा दावा त्यांनी केला.

रायगड लोकसभा मतदारसंघात कुणबी समाजाची मतेसुद्धा तटकरे साहेब यांनाच मिळतील कारण या समाजाची सर्व कामे त्यांनी मार्गी लावली आहेत. या समाजासाठी समाज हॉल, समाज मंदिरासह गावातील सर्व रस्ते बनवण्यात तटकरे आघाडीवर आहेत.

श्रीवर्धन, म्हसळा व अन्य तालुक्यातील मुस्लिम समाज हा तटकरे यांच्यासोबत असून विकासाची गती व सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचे कर्तृत्व खासदार तटकरे यांच्याकडे आहे. त्यामुळे काम करणाऱ्या व नेहमी जनतेसोबत राहणाऱ्या लोकप्रतिनिधी म्हणजेच खासदार सुनील तटकरे यांनाच मतदान करून मोठ्या मताधिक्याने निवडून देतील, असा दावा सरचिटणीस सुकुमार तोंडलेकर यांनी व्यक्त केला आहे.



# मतदार जागृतीसाठी सायकल रॅली

## तरुणांसह लहानग्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक कार्यक्रम १८९ कर्जत विधानसभा मतदारसंघाच्या वतीने सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.३१) सकाळी ७ वा. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, शिळफाटा खोपोली ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कर्जतदरम्यान सायकल रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीत शेकडो तरूणांनी सहभाग दर्शविला.

लोकसभा निवडणुकीत निर्भयपणे तसेच १०० टक्के मतदान होण्यासाठी खालापूर ते कर्जत या १७ किमी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी हिरवा झेंडा दाखवत सायकल रॅलीची सुरुवात केली. कार्यक्रमास खालापूर पोलीस ठाण्याचे उपविभागीय अधिकारी विक्रम कदम, खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, कर्जत तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांचेसह अपघातग्रस्ताचे मदतीसाठी टीम सदस्य, लायन्स क्लब खोपोली आदी सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

> ***मतदारांनी आपले मतदान केले पाहिजे. निवडणूक आयोगाने सहकार्य करण्यासाठी अनेक पर्याय मतदारांच्या समोर ठेवले आहेत. अपंग व ज्येष्ठ नागरिकांसाठी घरातून मतदान करण्यासाठी नियम अंमलात आणले आहेत. या सायकल रॅलीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या मतदार जनजागृती कार्यक्रमाला तरूण मतदारांचा मिळालेला प्रतिसाद उर्जा वाढविणारा आहे. यामुळे आगामी लोकसभा निवडणूकीत मतदानाचा टक्का नक्कीच वाढल्याचे पहायला मिळेल.***
>
> **-आयुब तांबोळी,**
> **तहसीलदार, खालापूर**



# प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात सेवानिवृत्तांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सेवानिवृत्तांचा सत्कार कार्यक्रम येथील सह्याद्री अतिथीगृह सभागृहात उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत होते. व्यासपीठावर भात विशेषज्ञ डॉ.भरत वाघमोडे, अधिदान व लेखा अधिकारी प्रदीप कदम उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. भगत म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांप्रति कृतज्ञता हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राची कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरविण्यात येत असून त्यात सेवानिवृत्त कर्मचारी, अधिकाऱ्यांचे मौलिक योगदान आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

डॉ. वाघमोडे म्हणाले की, सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार करणे, हा स्तुत्य उपक्रम आहे. संशोधन केंद्राने विकसित व शिफारशीत केलेल्या विविध भातवाणांत मजूर वर्गाचाही वाटा आहे. या वेळी डॉ. पी. आर. चौधरी, डॉ. ए. एस. दळवी, आर. के कळंबे, ए. सी सरपोतदार, प्रदीप कदम यांची समयोजित भाषणे झाली. कार्यक्रमात १०२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यानिमित्ताने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांनी दिलेल्या शुभेच्छा सेवानिवृत्तीधारकांना कळविताच टाळ्यांचा कडकडाट झाला. कार्यक्रमाच्या शेवटी सेवाकाळात तसेच सेवानिवृत्तीनंतर निधन झालेल्या कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री आर. सी. वेटकोळी, किशोर सातकर, दिलीप पाटील, लहू आसोलकर, योगेश आमरे, जितेंद्र कडू, अंगद निर्मळ यांनी परिश्रम घेतले.





**सार्वजनिक सूचना**

**वैद्यकीय नोंदणीनाश – बिरमोळे रुग्णालय**

बिरमोळे रुग्णालयातून सूचित करण्यात येते की, बिरमोळे रुग्णालयातील प्रवेश/भेटी किंवा चाचणी परिणाम संबंधित वैद्यकीय नोंद, बिरमोळे रुग्णालय, ११८/१ कफ नगर, ओल्ड पनवेल ४१०२०६, येथे नष्ट करण्यात येत आहे. रुग्णालयाच्या धोरणा नुसार, सर्व रुग्णांची वैद्यकीय नोंद ५ वर्ष कालावधी साठी ठेवाव्या लागतात.

वरील नियमाला अनुसरून ३१ डिसेम्बर २०१८ पर्यंतची सर्व वैद्यकीय माहिती (आंतररुग्ण, प्रवेश भेटी, चाचणी परिणाम) १ जुलै २०२४ रोजी नष्ट करण्यात येणार आहेत.

कोणत्याही रुग्णास या संबंधित आक्षेप असल्यास किंवा त्यांचे नोंदणी कागद पत्र हवी असल्यास, अशा रुग्णांनी ३० जून २०२४ पर्यंत रुग्णालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी क्र. – ९८२००८३१२४ / ०२२–२७४५५४८६

**स्वाक्षरी/–**
**संचालक**

**PUBLIC NOTICE**

**MEDICAL RECORD DESTUCTION**
**BIRMOLE HOSPITAL, PANVEL**

Birmole Hospital Notice is hereby given that Birmole Hospital will be destroying Medical Records related to Admission / Visits and / or test Result performed at Birmole Hospital, 118/1, CUF Road, Cuf Nagar Old Panvel, 410206.

**As per Hospital policy we have to maintain records of patients for a period of 5 years.**

In view of the above all Records up to 31st December 2018 have been selected for destruction will include all records for patients admission / visits / and Test Results will be destroyed on 1st July 2024.

Any person who has any objection or wish to acquire copies of their records may contact the Hospital before 30th June 2024.

Contact No. 9820083124/022-27455486

**Director**
**Birmole Hospital**

# पावसाळापूर्व कामे मेअखेर पूर्ण करा

## नवी मुंबई आयुक्तांचे संबंधितांना निर्देश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवणार नाही याची काळजी घेऊन आवश्यक पूर्वतयारी करावी. ३० मेपर्यंत पावसाळापूर्व कामे पूर्ण करावीत. यासाठी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महापालिकेसह शहरातील इतर सर्व प्राधिकरणांना निर्देश दिले आहेत. आपत्ती नियंत्रणाच्या दृष्टीने पावसाळ्याआधी व पावसाळा कालावधीत परस्पर समन्वय राखावा, असेही त्यांनी सूचित केले.

नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या नियोजन बैठकी झाली. या वेळी त्यांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या वेळी पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पावसाळ्याच्या अनुषंगाने करावयाच्या अत्यावश्यक कामांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच सध्याचा निवडणूक आचारसंहितेचा कालावधी लक्षात घेऊन ही कामे करण्यासाठी सरकारी पातळीवरून आवश्यक परवानग्या घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेत याबाबत तातडीने कार्यवाही करावी, असे प्रशासनाला आदेल दिले. या परवानग्या प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन प्रक्रिया तातडीने करून ही कामे विहित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने काटेकोर अंमलबजावणी करावी असेही त्यांनी सांगितले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर आपत्ती व्यवस्थापन समितीचे सचिव शरद पवार व शिरीष आरदवाड, शहर अभियंता संजय देसाई, इतर विभागप्रमुख व विभाग अधिकारी तसेच सिडको, एमआयडीसी, एमएमआरडीए, पीडब्ल्यूडी, नवी मुंबई पोलीस व वाहतूक पोलिस, एपीएमसी, रेल्वे, महावितरण, एमटीएनएल, आरएएफ, नागरी संरक्षण दल, महानगर गॅस लिमी., टीबीआयए, मच्छीमार संघटना आदी प्राधिकरणांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



### आयुक्त कैलास शिंदे यांनी केलेल्या सूचना

–सायन–पनवेल महामार्ग खड्डेमुक्त व सुस्थितीत राहावा या दृष्टीने संपूर्ण काळजी घ्यावी.

–महावितरणची तुटलेली झाकणे, सबस्टेशन, उघड्या केबलची दुरुस्ती तातडीने करा.

–महापालिका क्षेत्रात गरजेशिवाय नवीन खोदकामाची परवानगी देऊ नये.

–पावसाळा कालावधीत मध्यवर्ती नियंत्रण कक्ष तसेच अग्निशमन केंद्रातील कक्ष हे २४ द ७ सुसज्ज राहतील याकडे विशेष लक्ष द्यावे.

–पावसाळी कालावधीतील साथ रोग नियंत्रणासाठी तसेच मलेरिया व डेंगीसारख्या संभाव्य आजारांबाबत आवश्यक खबरदारी घ्या.

–धोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांच्या स्थलांतराबाबत कार्यवाही करा.

**कोणतीही आपत्ती आल्यानंतर त्यावर उपाययोजना करण्यापेक्षा आपत्ती येऊच नये यादृष्टीने खबरदारी घ्यावी. नैसर्गिक आपत्ती आलीच, तर त्यामध्ये हानी होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याकरिता ही पूर्वनियोजन बैठक महत्त्वाची आहे. सर्व अधिकाऱ्यांनी नियोजन करावे आणि त्याची गांभीर्याने अंमलबजावणी करावी.**
**–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# पोलीस असल्याचे भासवून उकळले तब्बल दोन कोटी

**नवी मुंबई : बातमीदार**

पोलीस असल्याचे भासवून एका टोळीने मुंबईतील एका व्यावसायिकाची कार वाशीमध्ये भररस्त्यात अडवून त्यांचे अपहरण केले. त्यानंतर त्यांच्याकडून दोन कोटींची खंडणी उकळून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे.

वाशी पोलिसांनी या टोळीविरोधात अपहरण, खंडणी तसेच जबरी लूट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणातील व्यावसायिक घाटकोपर येथे राहण्यास असून शुक्रवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास ते आपल्या कारने नवी मुंबईत कामानिमित्त आले होते. या वेळी त्यांची कार वाशी ब्रिजखालून पामबीचकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावर आली असताना दोन वेगवेगळ्या कारमधून पोलीस अधिकाऱ्यांच्या गणवेशात आलेल्या सहा जणांच्या टोळीने त्यांच्या कारच्या पाठीमागे व पुढे कार लावून कार थांबवली. त्यानंतर लुटारूंनी ते मुंबई पोलीस असल्याचे सांगून त्यांना दमदाटी केली तसेच त्यांच्याकडे पैशांचा साठा असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्याचे सांगून मनी लाँडरिंगमध्ये त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना अडकवण्याची धमकी दिली तसेच यातून वाचण्यासाठी त्यांच्याकडे दोन कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली.

घाबरलेल्या व्यावसायिकाने आपल्या मित्राशी संपर्क साधून त्याच्याकडून दोन कोटी रुपये मागवून घेतले. त्यानंतर त्यांनी दोन कोटी रुपये घेऊन पलायन केले. त्यानंतर शनिवारी दुपारी त्यांनी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सहा जणांच्या टोळीचा शोध सुरू केला आहे.

# तुर्भे गावातील आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

शिवछाया मित्र मंडळाच्या वतीने बबनशेठ पाटील यांच्या ३४व्या पुण्यस्मरणाचे औचित्य साधून रविवारी (दि. ३१) या दिवशी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. १५०हून अधिक रहिवाशांनी या शिबिराचा लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला.



तुर्भे गावातील तलावा जवळ झालेल्या या शिबिराचे उद्‌घाटन तुर्भे गावचे माजी सरपंच डी. डी. घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शिवछाया मित्र मंडळाचे अध्यक्ष अंकुश वैती, न्यूईरा हॉस्पिटलचे सीईओ डॉ. अमित डंकी, डॉ. सोनल अग्रवाल यांच्यासह आदी उपस्थित होते.

नवी मुंबईतील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव हा याच संस्थेचा उपक्रम आहे. गरीब व गरजूंना मोफत वैद्यकीय सेवा सुविधा मिळाव्यात या उद्देशाने मंडळ सातत्याने अनेक आरोग्य विषयक उपक्रमही राबवित असते. याचाच एक भाग म्हणून शिवछाया मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बबनशेठ पाटील यांच्या ३४ व्या पुण्यतिथि निमित्त शिवछाया मित्र मंडळ आणि न्यूईरा हॉस्पिटल, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत तुर्भे गावातील तलावाजवळ आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, दंत चिकित्सा, नेत्र चिकित्सा तसेच इतर शारीरिक तपासण्या विनामूल्य करण्यात आल्या. नेत्र चिकित्सा केल्यानंतर रुग्णांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. या वेळी मंडळाचे अशोक पाटील,रामकृष्ण पाटील, सुशील घरत, नंदकुमार पाटील, अजय गुरव विजय पाटील, शत्रुघ्न पाटील आदी उपस्थित होते.

शिवछाया मित्र मंडळ ही १९७० साली सुरु झालेली नवी मुंबईतील एक जुनी संस्था आहे. या संस्थेने गेली ५४ वर्षे सामाजिक बांधिलकी जोपासत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला – क्रीडा विषयक उपक्रम राबवले आहेत.

# ‘तृतीयपंथीयांचे एखादे संघटन असावे’

**पनवेल : प्रतिनिधी**

भविष्यामध्ये ततीयपंथीयांचे एखादे संघटन असावे, असे मत आश्रय सोशल फाउंडेशन या संस्थेचे अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी शुक्रवारी (दि. २९) तृतीय पंथीयांचे हक्काचे संरक्षण व कल्याण या योजनेंतर्गत आयोजित रंगपंचमीच्या कार्यक्रमात व्यक्त केले.

आश्रय सोशल फाउंडेशनच्या पनवेल येथील कार्यालयात तृतीय पंथीयांसाठी आयोजित करण्यात आलेल्या रंगपंचमीच्या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी उपस्थित टि.जी.ना मार्गदर्शन केले. संघटनेच्या आधारे टि. जी.वर होणारे अन्याय अत्याचाराचे निवारण करणे शक्य होईल. आपले आरोग्य सुदृढ असावे आणि सर्व सामान्याप्रमाणे समाजात जगता यावे यासाठी सर्वांना प्रयत्न करावे लागतील, असेही अशोक गायकवाड यांनी सांगितले.



या वेळी व्यवस्थापक उर्मिला यादव, शिल्पा हलणकर, दिक्षिता गावंड, रुकैया बारगीर, मनाली घोसळकर, अश्विनी सावंत, नितिन गणेचारी आश्रयच्या मनीषा पवार, संजीवनी सावंत, मीनल मोहिते, प्रज्ञा कांबळे, सुषमा पवार, प्राजू खंडगाळे, सुषमा मांडलेकर, राखी कचरे व ज्योति मगरे उपस्थित होते.

**तृतीयपंथींना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी आश्रय सोशल फाउंडेशनच्या प्रयत्नाने तृतीयपंथी लोकांना मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, ३० जेंडर ओळखपत्र काढून देण्यात आले आहेत.**
**–शिल्पा हलणकर, प्रकल्प प्रमुख, आश्रय सोशल फाउंडेशन**

# कोकण रेल्वे व्यवस्थापकीय संचालकपदी संतोष कुमार झा

**नवी मुंबई : बातमीदार**

१९९२च्या बॅचचे भारतीय रेल्वे वाहतूक सेवा अधिकारी संतोष कुमार झा यांनी १ एप्रिल रोजी कोकण रेल्वेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून पदभार स्वीकारला.



संतोष कुमार झा हे एमएस.सी लखनौ विद्यापीठातून भूगर्भशास्त्रात आणि जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई येथून मार्केटिंगमध्ये एमबीए केलेले आहे. त्यांच्या सध्याच्या नियुक्तीपूर्वी, संत कुमार झा यांनी कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये संचालक (ऑपरेशन आणि कमर्शियल) म्हणून काम केले होते. त्यांना ऑपरेशन्स, इन्फ्रास्ट्रक्चर प्लॅनिंग आणि बिझनेस डेव्हलपमेंटमध्ये २८ वर्षांचा समृद्ध अनुभव आहे. संतोष कुमार झा यांनी रेल्वेच्या प्रमुख विभागांमध्ये ऑपरेशन्सचे प्रमुख पदही भूषवले आहे. लॉजिस्टिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण व्यावसायिक युनिट्सचे नेतृत्व केले आहे. त्यांचा अनुभव रेल्वे आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील व्यावसायिक आणि व्यवसाय विकास भूमिकांमध्ये १५ वर्षांपेक्षा जास्त आहे. त्यांचे कौशल्य सानुकूल कार्यपद्धती हाताळणे, प्रशिक्षण आणि राजभाषा विभागांचे अग्रगण्य, आणि धोरणात्मक नियोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे यासाठी विस्तारित आहे. मल्टी–मॉडल लॉजिस्टिक हब, साइडिंग्स आणि प्रायव्हेट फ्रेट टर्मिनल्स (पीएफटी) स्थापन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

# सुनील पवार अतिरिक्त आयुक्तपदी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिकेचे आयुक्त सुनील पवार यांची नवी मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

आयुक्त कैलास शिंदे यांनी सुनील पवार यांच्याकडे अतिरिक्त आयुक्त (१) पदाचा कार्यभार सोपवण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये मालमत्ता कर, स्थानिक संस्था कर, जनसंपर्क विभाग, माझी वसुंधरा, घनकचरा, परवाना आदी विभागांच्या कामकाजाचा सामावेश आहे. मालमत्ता कर विभाग हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. यापूर्वी माजी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्याकडे हे खाते होते.

राज्य सरकारने उपमुख्य कार्यकारी अधिकारी संघरत्ना खिल्लारे यांची नवी मुंबई महापालिकेत उपआयुक्त म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे. आयुक्त शिंदे यांनी खिल्लारे यांच्याकडे विधी विभाग आणि संचालक, दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्राचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.

# तापमान वाढतेय! आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यासह नवी मुंबईतील तापमान वाढू लागले आहे. ही सातत्याने होणारी वाढ पाहता नागरिकांना उष्माघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी स्वत:ला जास्तीत जास्त हायड्रेट ठेवावे, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला आहे.

राज्यात तापमानवाढ झाली आहे. अशात उष्णतेच्या दीर्घकाळ संपर्कामुळे शरीर त्याच्या अंतर्गत तापमानाचे नियमन करू शकत नाही तेव्हा उष्माघात, तीव्र उष्णतेशी संबंधित समस्या निर्माण होते. अशात स्वत:ला हायड्रेट ठेवल्यास या धोक्यापासून बचाव करता येणे शक्य आहे. यासाठी ओरल रिहायड्रेशन सोल्युशन्ससह (ओआरएस) लस्सी, लिंबू पाणी आणि ताक यासारख्या घरगुती पेयांचा वापर करावा. तसेच पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवावे, असे आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले. तसेच फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरा, उन्हात गॉगल, छत्री वापरा, टोपी, हॅटखाली ओलसर कापड किंवा रुमाल ठेवण्याच्या सल्ला तज्ज्ञांनी दिला.

### कशी घ्याल काळजी?

भरपूर पाणी प्या– तहान लागली नसली तरीही दिवसभर भरपूर प्रमाणात पाणी प्यावे. कॅफिन किंवा अल्कोहोल असलेली पेये टाळा, कारण ते शरीराचे निर्जलीकरण करू शकतात. रसदार फळांचे सेवन करा. प्रथिने जास्त प्रमाणात घेणे टाळा.



थंड ठिकाणी राहा : दिवसाच्या सर्वांत जास्त उष्णता असलेल्या वेळेत म्हणजे सकाळी ११ ते ४ या वेळेत घरात किंवा सावलीच्या ठिकाणी राहा. तसेच घराबाहेरील, विशेषत: दिवसाच्या सर्वांत उष्ण वेळेत कामे कमी करण्याचा प्रयत्न करा. शेतकऱ्यांनी दुपारच्या वेळी शेतात काम करणे टाळावे.

योग्य पोशाख परिधान करा : हलके, सैल कपडे घाला. गडद रंगाचे कपडे परिधान करणे टाळा. चेहऱ्याचे आणि डोळ्यांचे सूर्यापासून संरक्षण करण्यासाठी रुंद टोपी आणि सनग्लासेस वापरा.

### उष्माघाताची कारणे

घराबाहेर जास्त वेळ काम करणे, उन्हाळ्यात मजुरीची कामे करणे, कारखान्याच्या ब्रॉयलर रूममध्ये काम करणे, उच्च तापमानात खोलीत काम, घट्ट कपडे घालणे

लक्षणे– थकवा, ताप, कोरडी त्वचा, भूक न लागणे, चक्कर येणे, नैराश्य, डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, बेशुद्ध पडणे.

**उष्माघातात बदललेली लक्षणे, मानसिक स्थिती, फेफरे आणि चेतना नष्ट होणे, यावर त्वरित वैद्यकीय उपचार करणे आवश्यक आहे. घरगुती थंड पेये तयार करून त्याचे सेवन करावे. काम नसल्यास घराबाहेर जाणे टाळावे.**
**–डॉ. मधुकर गायकवाड, जे. जे. रुग्णालय**

### काय करावे?

रुग्णाला हवेशीर खोलीत ठेवावे, पंखे, कूलर खोलीत ठेवावे, वातानुकूलित खोली ठेवावे, रुग्णाला थंड पाण्याने अंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाणी ठेवावे, बर्फाचा पॅक लावावा, आवश्यकतेनुसार इंट्राव्हेनस सलाईन घ्या.

# एपीएमसीत रसाळ खरबुजांची आवक वाढली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी ऋतूमानानुसार वेगवेगळी फळे बाजारात येत असतात. सध्या उन्हाळा सुरू झाल्यापासून बाजारात उन्हाळी फळांची आवक वाढल्याचे चित्र आहे. रमजानचे दिवस सुरू असल्याने फळांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उन्हाळ्यात मिळणाऱ्या फळांपैकी खरबूज हे फळ चविष्ट तर आहेच, त्याचसोबत शरीरासाठीदेखील गुणकारी आहे. वाशीतील एपीएमसीत कलिंगड, पपईसोबतच खरबुजांची आवक वाढली असून विविध प्रजाती ग्राहकांच्या पसंतीस पडत आहेत.



वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवारी दोन हजार ९५५ क्विंटल खरबुजांची आवक झाली आहे. युरोपियन कँटालूप म्हणजेच नारंगी खरबूज, उत्तर अमेरिकन खरबूज, सारडा खरबूज, हनीड्यू, पर्शियन खरबूज, कँडी किस खरबूज, कॅनिरी खरबूज आदी प्रकारच्या खरबुजांच्या प्रजाती बाजारात उपलब्ध झाल्या आहेत.

भारतात दरवर्षी अंदाजे एक ते दोन दशलक्ष टन खरबुजाचे उत्पादन घेतले जाते. उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश आणि पंजाब ही राज्ये खरबुजांच्या उत्पादनात देशात अग्रगण्य आहेत. या भागांमध्ये हार मधू, दुर्गापुरा मधू, पुसा शरबरी, अर्का राजहंस, अर्का जीत, पुसा मधुरस आणि पुसा रसराज या प्रजातींच्या खरबुजांचे उत्पादन प्रामुख्याने घेतले जाते.

### खरबूज खाण्याचे फायदे

खरबुजामध्ये मोठ्या प्रमाणात फायबर आणि क जीवनसत्त्वाचा साठा असल्याने पचन तंत्र मजबूत ठेवण्यास मदत होते. त्याचसोबत अल्सर, बद्धकोष्ठता, अपचन यांसारख्या पोटाशी निगडित समस्या दूर ठेवण्यास मदत करते. रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठीदेखील फायबरयुक्त खरबूज फायदेशीर ठरते. खरबुजामध्ये दाहकविरोधी आणि अँटीऑक्सिडेंट गुणधर्म असल्याने स्नायू बळकट करण्यास आणि सांधिवाताच्या समस्येवर आराम मिळवून देण्यास मदत करते. क आणि अ जीवनसत्वे दृष्टी निरोगी ठेवण्यास मदत करते. पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने रमजान काळात रोजे सोडतेवेळी शरीरात कमी झालेल्या पाण्याचे प्रमाण भरून काढण्यासाठीदेखील खरबुजाचे सेवन केले जाते.

**रमजानचा काळ सुरू असल्याने रसाळ फळे विकत घेण्याकडे लोकांचा कल असतो. येत्या एक–दोन महिन्यांत खरबुजांची आवक चांगली राहणार असून खरबुजांच्या दरात फारसा फरक पडेल याची शक्यता नाही. त्यामुळे दर स्थिर राहतील आणि व्यापाऱ्यांना काही प्रमाणात याचा फायदा होईल.**
**–सुनील शुक्ला, खरबूज व्यापारी, वाशी एपीएमसी**

### कस्तुरीला मोठी मागणी

भारतात कस्तुरी खरबुजाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. कस्तुरीचे मूळ हे इराण, अनातोलिया आणि अर्मेनिया येथे आहे. कस्तुरी खरबूजमध्ये अ आणि क जीवनसत्वांचा मोठ्या प्रमाणात साठा सापडतो. त्यात सुमारे ९० टक्के पाणी आणि नऊ टक्के कर्बोदके आढळतात. चवीला गोड असल्याने कस्तुरी खरबूजला महाराष्ट्र तसेच देशभरातून मोठी मागणी असते.

# वरंध घाट आजपासून वाहतुकीस बंद

## रस्ता दुपदरीकरण व संरक्षक भिंती बांधण्याचे काम सुरू

**महाड : रामप्रहर वृत्त**

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा महाड-पुणे-पंढरपूर मार्गावरील वरंध घाट १ एप्रिल ते ३० मे या कालावधीमध्ये सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. वरंध घाटामध्ये रस्ता दुपदरीकरणाचे व घाटामध्ये संरक्षक भिंती बांधण्याचे काम सुरू असल्याने वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्द येथील वाहतूक बंद करण्याचा जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. रायगडचे अप्पर जिल्हा दंडाधिकारी संदेश शिर्के यांनी हे निर्देश जारी केले आहे.



वरंध घाट हा व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचा घाट मानला जातो. महाड, दापोली, मंडणगड या तालुक्यातील व्यापारी वाहतूक या घाटातून होते. पुणे तसेच पश्चिम महाराष्ट्रातून होणारी व्यापारी मालवाहतूक तसेच महाड औद्योगिक क्षेत्रांमध्ये येणाऱ्या मालाची वाहतूक या घाटातून होते. महाडमध्ये दररोज येणारी भाजी तसेच दूध वाहतूक यासाठी या घाटाचा वापर केला जात असतो. प्रवाशांनाही महाडमार्गे भोर, पुणे, पंढरपूर, फलटण या भागात जाण्यासाठी वरंध घाटातून प्रवास करावा लागतो.

महाड, वरंध घाट, भोरमार्गे पुणे हा सुमारे १२० किमीचा रस्ता असून पुणे येथे जाण्यासाठी हा जवळचा मार्ग आहे. हाच रस्ता पंढरपूर येथे जात असल्याने महाड-पंढरपूर राज्यमार्ग म्हणून ओळखला जातो, परंतु काही वर्षांपूर्वी हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. पुणे येथून महाडकडे येण्यासाठी हा जवळचा रस्ता असल्याने या ठिकाणाहून नेहमीच प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात होते.

मागील काही वर्षांपासून अतिवृष्टीमुळे हा रस्ता तसेच या मार्गावरील वरंधघाट धोकादायक स्थितीमध्ये होता. दरड कोसळल्याने अनेकदा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला जात होता. त्यामुळे रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम महामार्ग विभागाकडून सुरू करण्यात आले आहे.

### *पर्यायी मार्गाने प्रवास*

***घाटातील काम प्रगतिपथावर असून आता पारमाची वाडीजवळ संरक्षक भिंती व रुंदीकरणाचे काम केले जाणार आहे. त्यामुळे आता सर्व प्रकारच्या वाहनांना ताम्हिणीमार्गे तसेच अन्य पर्यायी मार्गाने प्रवास करावा लागणार आहे. याबाबतची माहिती घेतल्यानंतर जिल्हा प्रशासनाने वरंध गाव ते रायगड जिल्हा हद्द अशी वरंध घाटातील वाहतूक एक एप्रिल ते ३० मे या कालावधीसाठी सर्व वाहनांसाठी बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.***

# आरटीओने ई-रिक्षांचे दर निश्चित करावे; स्थानिकांची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**



माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू झाल्याने स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दस्तुरी ते माथेरान रेल्वेस्टेशन दरम्यान प्रतिमाणसी ३५ रुपये दर आकारण्यात येत आहे. सहा ते सात मिनिटांत हे अडीच किमी अंतर ई-रिक्षाच्या प्रवासासाठी लागते. त्यामुळे आरटीओने ई-रिक्षांचे दर निश्चित करावे, अशी मागणी स्थानिकांमधून आता करण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करण्यासाठी फक्त पाच रुपये इतका माफक दर ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे काही महिने येथील शासकीय अधिकारी, कर्मचारी वर्गाला दस्तुरी-माथेरान-दस्तुरी या प्रवासासाठी दर दिवसाला केवळ पाच रुपयांत मासिक पास देण्यात आले होते. यामुळे अनेकदा ३५ रुपये दर भरणाऱ्या प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत होते, परंतु नागरिकांच्या तक्रारीवरून ही सुविधा बंद करण्यात आली आहे. ज्या ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना इथे शासकीय खोल्या उपलब्ध आहेत, अशी मंडळीसुद्धा नेरळ अथवा कर्जत याठिकाणी राहून ई-रिक्षांच्या सहाय्याने नोकरीसाठी येतात, तर येथील निमशासकीय कर्मचारीसुद्धा आपल्या स्वतःच्या खोल्या असताना माथेरान परिसरात वास्तव्यास आहेत. यासाठी आरटीओने या ई-रिक्षांचे परवडणारे दर निश्चित केल्यास सर्वांना सोयीस्कर होऊ शकते, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# नवनगर प्रकल्पाबाबत पेणमध्ये हरकती, सूचना नोंदविणे सुरू

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यासह उरणमध्ये येणाऱ्या एमएमआरडीच्या नवनगर प्रकल्पाबाबत हरकती, सूचना नोंदवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. साधारण १५ हजार शेतकऱ्यांनी हरकती नोंदवल्या असून पुढे काम चालू असल्याची माहिती मिळाली आहे.

२४ गाव सेझविरोधी संघर्ष कमिटी पेण, रायगड या कमिटीच्या वतीने एक निवेदन प्रांत अधिकारी पेण यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, त्या ठिकाणी प्रकल्प उभारला जाणार आहे तो भाग शेती, किनारपट्टीचा सधन भाग आहे. रायगड हे भाताचे कोठार आहे. ३० दिवसांत हरकती घेणे या काहीसे अशिक्षित लोकांना जमणे अशक्य आहे. परिसर मोठा आहे. शिवाय आज शेतकरी कागदपत्रे जमा करण्यास वेळ खर्ची होत आहे. ३० तारखेपर्यंत हरकतीचे फॉर्म जमा करताना आचारसंहितेची पायमल्ली होईल. हे निवेदनात निदर्शनास आणून दिले आहे. म्हणून सहसंचालक नगररचना यांनी ३० दिवसांची मुदत न देता आणखी मुदत देणे अपरिहार्य आहे, असे निवेदनात नमूद केले आहे.



# तळा तालुक्यातील द्रोणागिरी देवस्थान रस्त्याचे काम प्रगतिपथावर

**तळा : रामप्रहर वृत्त**

तळा तालुक्यातील प्रसिद्ध द्रोणागिरी देवस्थान रस्त्याचे काम प्रगती पथावर असून रस्त्याच्या सुविधेमुळे द्रोणागिरी यात्रेला नागरिकांची मोठ्या संख्येने गर्दी होण्याची शक्यता आहे.



द्रोणागिरी डोंगरात वसलेल्या डोनोबाच्या यात्रेसाठी दरवर्षी एप्रिलमध्ये हनुमान जयंतीला भाविक आवर्जून येत असतात. याठिकाणी असलेल्या देव डोनोबा व देवी पद्मावतीचे दर्शन घेऊन देवाची लाट पाहण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी उसळते. मात्र, याठिकाणी जाण्या-येण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने भाविकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. बहुतांश वयोवृद्धांना इच्छा असूनही केवळ वाहतुकीची सुविधा नसल्याने यात्रेसाठी येता येत नव्हते. या वेळी एप्रिल महिन्यात असलेल्या द्रोणागिरी यात्रेच्या अगोदर हे रस्त्याचे काम पूर्ण व्हावे जेणेकरून जास्तीत जास्त भाविकांना डोंगरावर यात्रेसाठी जाता येईल, अशी अपेक्षा मंत्री महोदयांनी व्यक्त केली होती. तेव्हापासून या रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून जवळजवळ या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

एप्रिल महिन्यात द्रोणागिरी यात्रा असून त्या आधी हे काम पूर्णत्वास गेल्यास तालुक्यासह दूरदूरवरून येणाऱ्या भाविकांना डोंगरावर यात्रेला जाणे सोयीस्कर होणार आहे.

# म्हसळ्यात रंगपंचमी उत्साहात

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

सालाबादप्रमाणे याही वर्षी म्हसळा शहरामध्ये रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिकरित्या साजरा करण्यात आला. रंगपंचमीच्या उत्सवात छोट्या-छोट्या बच्चे कंपनीच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

दरवर्षी म्हसळा कुंभार समाजाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने लहान मुलांतून राधा-कृष्ण, सुदामा, पेंद्या अशा प्रकारच्या भूमिका बजावणारी मुले नटूनथटून बैलगाडीमध्ये रथ तयार करून त्यांची संपूर्ण शहरभरातून मिरवणूक काढण्यात आली. शेवटी हा रथ धावीर देव विराजमान झालेल्या ठिकाणी होळीच्या पटांगणात विसर्जित करण्यात आला.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती कळताच वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन करण्यात आले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मंडळींनी पेझारी येथे पाटील कुटुंबियांची शनिवारी (दि.३०) सांत्वनपर भेट घेतली.

मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. ज्या नेते मंडळींना त्यांना अखेरचा निरोप देता आला नाही, त्यांनी शनिवारी पेझारी येथे त्यांच्या राहत्या घरी जाऊन पाटील कुटुंबियांची भेट घेतली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, ना. आदिती तटकरे यांच्यासह गोपाळ अग्रवाल, सांगोल्यातील शेकापच्या कार्यकर्त्यांनी पेझारी येथे जाऊन सांत्वन केले. या वेळी जि. प. माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, जि. प. माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जि. प. माजी सदस्य भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील आदी कुटूंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.



**पोलादपूर : तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सडवली आदिवासीवाडी प्राथमिक शाळेच्या शिक्षिका प्राजक्ता मोरे यांनी रंगपंचमीनिमित्त आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये रंगांची उधळण करण्याची संधी निर्माण केली, तर दुर्गम राजिप ढवळे शाळेतील शिक्षक उल्हास पवार यांनी रंगपंचमीचा आनंद लुटण्यास विद्यार्थी-विद्यार्थिनींना मुभा दिल्याचे दृश्य.** (छाया : शैलेश पालकर)

# उन्हाळी हंगामातील भातशेती बहरली

## डोलवहाळ बंधाऱ्याचा शेतकऱ्यांना आधार

**रोहा : रामप्रहर वृत्त**

कालव्याच्या पाण्यावर आधारित केली जाणारी उन्हाळी हंगामातील भातशेती चांगलीच बहरल्याने शेतकरीवर्ग समाधानी दिसत आहे. रोहा तालुक्यातील डोलवहाळ बंधाऱ्याच्या माध्यमातून कालव्याच्या सहाय्याने काही भागात उन्हाळी हंगामातील भातशेती पिकविली जाते.



उन्हाळी हंगामातील भातशेतीचे पीक हे शेतकरीवर्गाचे हातात असल्याने ते त्यांना चांगले परवडते, तर कालव्याच्या माध्यमातून शेतीला आवश्यक पाणीपुरवठा केला जात असल्याने पाण्याचेही योग्य प्रकारे नियोजन करून आपल्याला आवश्यक असणारी पिके सहजपणे पिकविली जातात. साधारणपणे डिसेंबर महिन्यात कालव्याचे पाणी उपलब्ध झाले तर साधारणपणे ९० ते १२० दिवसात भातपिके तयार होऊन कापणी लायक होतात, तर कधी पाणी उशिरा मिळाल्याने पुरेसा हंगाम मिळत नसल्याने पहिल्याच येणाऱ्या मोसमी पावसामुळे भातशेतीचे नुकसान होण्याची शक्यता असते, परंतु या वर्षी पाटबंधारे विभागाकडून किमान वेळेत पाण्याचे नियोजन झाल्याने भातशेतीही योग्य पद्धतीशे बहरल्याने शेतकरी वर्ग चांगलाच समाधानी दिसत आहे.

अधून-मधून ढगाळ वातावरणामुळे अवकळी पावसाची टांगती तलवारही त्यांच्या डोक्यावर कायम असल्याने अवकाळी पावसाचा धसकाही शेतकरी वर्गाने घेतला आहे.

# कर्जतच्या शिवसैनिकांचा खासदार श्रीरंग बारणे यांना निवडून देण्याचा निर्धार

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

खासदार श्रीरंग बारणे यांची मावळ लोकसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शनिवारी (दि.३०) पहिल्यांदाच कर्जतमध्ये शिवसेनेच्या सर्व कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.



कर्जत-खालापूर मतदारसंघात आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वात श्रीरंग आप्पा बारणे यांना बहुसंख्य मताने निवडून देण्याचा शिवसैनिकांनी निर्धार केला असून सर्व शिवसैनिक तयारीला लागले आहेत, असे बोलले जात आहे. याही वेळी त्यांना विकासकामांच्या जोरावर आणि समस्त शिवसैनिकांच्या बळावर पुन्हा एकदा विजयश्री मिळवून देण्यासाठी कर्जत-खालापूर मतदार संघातील शिवसैनिक सज्ज झाले. कर्जतमध्ये आले असता त्यांचे शिवसेनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

बाळासाहेब भवन येथे आयोजित केलेल्या छोटेखानी कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी औक्षण केल्यावर जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी बारणे यांना हॅट्ट्रिक करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या वेळी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोह्यात कबड्डी स्पर्धेचा थरार

## रोठ खुर्द संघ आगरी चषकाचा मानकरी



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोकबन येथील वाजंत्री क्रीडा नगरीत शनिवार (दि. ३०) रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भव्यदिव्य कबड्डी स्पर्धेचे प्रकाशझोतात आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील नामवंत ३२ संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. अंतिम लढत वाघेश्वर रोठ खुर्द व टीबीएम कारावी या दोन बलाढ्य संघांमध्ये चुरशीची झाली. यात धीरज खरीवले याच्या उत्कृष्ट चढाया व सनी भगत, आशिष मोरे यांनी केलेल्या अप्रतिम पकडीच्या जोरावर रोठ खुर्द संघाने बाजी मारून आगरी कबड्डी चषक आणि रोख ५१ रुपयांचे पारितोषिक पटकाविले.

तृतीय क्रमांक जय हनुमान वाशी, चतुर्थ क्रमांक वादळ खारिकवाडा या संघांनी मिळविला. मालिकावीर ओंकार खेरटकर (रोठ खुर्द), उत्कृष्ट पकडपटू विकास जोगडे (वाशी), उत्कृष्ट चढाईपटू करण पाटील (कारावी), पब्लिक हिरो म्हणून ओंकार मेस्त्री (खारिक वाडा) याची निवड करून त्यांनाही बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेला प्रो कबड्डी खेळाडू रिशांक देवाडीका, आमदार महेंद्र दळवी, राष्ट्रीय खेळाडू अनंत वारगे, संजय म्हात्रे, प्रमोद म्हात्रे, भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे, उद्देश वाडकर, कोकबन सरपंच तेजस्विनी वाजंत्री यांनी भेट दिली.

आगरी ज्ञाती सेवा मंडळाचे अध्यक्ष हरिश्चंद्र मोरे, उपाध्यक्ष अनिल माळी, सचिव विलास म्हात्रे, अतुल पाटील, आगरी नेते हरिश्चंद्र वाजंत्री, सचिन मोरे, दिलीप म्हात्रे, नंदुकुमार म्हात्रे, रामचंद्र सपकाळ, रामाशेठ म्हात्रे, हेमंत ठाकूर, तुषार वाजंत्री, हेमंत कांबळे, विठ्ठल मोरे, ज्ञानेश्वर मुंगळे, भरत मुंगळे, दिनेश कांबळे, जयवंत मुंगळे, प्रवीण मोरे, संदेश मोरे, विलास डाके, शंकर दिवकर, वामन पारंगे, सुरेश पाटील, रामचंद्र मोरे, शंकर दिवकर, अमित कांबळे, विठ्ठल मोरे, नरेश म्हात्रे, दत्ताराम मोरे, सुरेश पाटील, मोरेश्वर कोल्हटकर, अशोक ठाकूर, देवचंद म्हात्रे तसेच सर्व आगरी बांधवांनी अथक मेहनत घेऊन स्पर्धा यशस्वी केली. संतोष दिवकर यांना सेंद्रिय शेती पुरस्कार आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते देण्यात आला. समालोचन अलंकार मनवी व संकेश सर्लेकर यांनी केले.

# लखनऊची पंजाबवर मात

## मयंक, मोहसीनची शानदार गोलंदाजी



**लखनऊ : वृत्तसंस्था**

### पदार्पणवीराची भेदक गोलंदाजी

मयंक यादवने आपला पदार्पणाचा सामना खेळताना शानदार गोलंदाजी करीत लखनऊ संघाला सामन्यात परत आणले. मयंकने त्याच्या तीन विकेटसह यंदाच्या आयपीएलमधील १५५.८ किमी प्रति तास वेग असलेला सर्वांत वेगवान चेंडू टाकला. सतत भेदक आणि वेगवान गोलंदाजीचा मारा करीत त्याने फलंदाजांनी जेरीस आणले.

लखनऊ सुपर जायंट्स संघाने यंदाच्या आयपीएलमधील आपला पहिला विजय मिळवला आहे. घरच्या मैदानावर त्यांनी पंजाब किंग्सवर २१ धावांनी विजय मिळवला. पदार्पणवीर मयंक यादवच्या भेदक आणि वेगवान गोलंदाजीच्या जोरावर संघाने लखनऊने पंजाब किंग्सकडून विजय हिसकावून घेतला. मयंक आणि नंतर मोहसीन खान हे संघाच्या विजयाचे नायक ठरले.

लखनऊच्या अटलबिहारी वाजपेयी एकना स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात लखनऊने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करीत १९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जला चांगल्या सुरुवातीनंतर २० षटकांत पाच गडी गमावून केवळ १७८ धावाच करता आल्या. लखनऊकडून वेगवान गोलंदाज मयंक यादवमुळे लखनऊने सामन्यात शानदार पुनरागमन केले. केएल राहुलऐवजी निकोलस पुरन या सामन्यात संघाचे नेतृत्व करीत होता. सुरुवातीला शिखर धवन आणि जॉनी बेयरस्टोची फलंदाजी पाहता सामना हातातून निसटल्याचे दिसले, पण मयंकच्या गोलंदाजीने सामन्याचा रोख बदलला.

खरंतर २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाब किंग्जची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर धवन आणि बेअरस्टो यांनी पहिल्या विकेटसाठी १०२ धावांची मोठी भागीदारी केली. धवनने ५० चेंडूंत तीन षटकार आणि सात चौकारांच्या जोरावर ७० धावा केल्या, तर बेयरस्टो तीन चौकार आणि तीन षटकार लगावत २९ चेंडूंत ४२ धावा करीत बाद झाला. प्रभसिमरन सिंगने येताच विस्फोटक फलंदाजीला सुरुवात केली. बाद होण्यापूर्वी त्याने सात चेंडूंत १९ धावा केल्या, ज्यात त्याने दोन षटकार आणि एक चौकार लगावला, तर जितेश शर्मा नऊ चेंडूंत सहा धावा करॅत बाद झाला. लियाम लिव्हिंगस्टोनने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत सामना हातातून निसटला होता. त्याने १७ चेंडूंत दोन षटकार आणि दोन चौकारांसह २८ धावांची नाबाद खेळी केली.

शिखर धवन आणि बेयरस्टोची भागीदारी तोडणं कोणालाच शक्य होत नव्हते, पण पदार्पणाचा सामना खेळत असलेल्या मयंक यादवने ही भागीदारी तोडली. मयंकने १२व्या षटकातील चौथ्या चेंडूवर जॉनी बेअरस्टोला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्याने १४व्या षटकात आणखी एक विकेट मिळवत प्रभसिमरन सिंगला नवीन उल हककरवी झेलबाद केले. त्यानंतर पंजाबची धावसंख्या १३९ धावांवर असताना त्यांनी तिसरी विकेट गमावली. मयंकच्याच चेंडूवर उपकर्णधार जितेश शर्मा झेलबाद झाला.

पंजाब किंग्जला १७व्या षटकात दोन मोठे धक्के बसले. मोहसीन खानने षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर कर्णधार शिखर धवनची विकेट घेतली. त्यानंतर त्याच षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मोहसीनने सॅम करनला निकोलस पुरनकरवी झेलबाद केले. करन गोल्डन डकवर बाद झाला आणि तिथून पंजाबच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या.

तत्पूर्वी लखनऊने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ गडी गमावून १९९ धावा केल्या. सलामीवीर क्विंटन डी कॉकने अर्धशतक (५४) झळकावले. त्याच्याशिवाय कृणाल पांड्याने ४३ धावांची, तर निकोलस पुरनने ४२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली, ज्यामुळे संघाला २०० धावांचा टप्पा गाठता आला. पंजाब किंग्जकडून सॅम करनने तीन विकेट्स मिळवल्या. त्याच्याशिवाय अर्शदीप सिंगने दोन आणि कागिसो रबाडा व राहुल चहरला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेत पनवेल संघ विजेता



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील टाकादेवी स्पोर्ट क्लब मांडवा व ग्रामस्थ मंडळ आयोजित जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेत स्व. रुची पाटील चषक २०२४ पनवेल संघाने पटकाविला. यजमान संघ उपविजेता ठरला.

स्पर्धा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने टाकादेवी क्रीडा नगरीत झाली. स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत १६ संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघातील खेळाडूची निवड करून त्यांचा सामनावीर किताब देऊन सन्मान करण्यात आला तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या जिल्हा, राज्य व राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

तृतीय क्रमांक ओंकार वेश्वी संघ, चतुर्थ क्रमांक भिलालेश्वर संघाने मिळविला. स्पर्धेत मालिकावीर तेजा सकपाळ, उत्कृष्ट चढाईपटू ईशा पाटील, उत्कृष्ट पकडपटू चैताली म्हात्रे, पब्लिक हिरो म्हणून नमिषा म्हात्रे यांची निवड करण्यात आला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण राजन पाटील व कुटुंबीय तसेच मंडळाचे अध्यक्ष केशव पाटील, उपाध्यक्ष अशोक घरत, सल्लागार गजानन पाटील, सुनील म्हात्रे आदींच्या हस्ते करण्यात आले. सर्वांचे आभार ज्येष्ठ खेळाडू अंकुर घरत यांनी मानले.

# गुजरातचा हैदराबादवर विजय

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सने घरच्या मैदानावर सनरायझर्स हैदराबादवर सहज विजय मिळवला. ३४ वर्षीय गोलंदाज मोहित शर्माच्या उल्लेखनीय माऱ्यानंतर साई सुदर्शनने फलंदाजीत दमदार खेळ केला. शुबमन गिल, डेव्हिड मिलर व वृद्धीमान सहा यांनीही चांगली फलंदाजी केली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादला गुजरात टायटन्सने १६२ धावांत रोखले. गुजरातकडून अभिषेक शर्मा आणि अब्दुल समादने सर्वाधिक २९ धावा केल्या. गुजरातच्या भेदक माऱ्यासमोर हैदराबादच्या एकाही फलंदाजाला ३० धावांच्या पुढे धावा केल्या नाहीत. गुजरातकडून सर्व गोलंदाजांनी चांगला मारा केला. यात मोहित शर्माने स्लॉग ओव्हरमध्ये दमदार मारा करत चार षटकांत २५ धावा देत तीन विकेट्स घेतल्या.

# बाबर आझम पुन्हा पाकिस्तानचा कर्णधार

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**



पाकिस्तान क्रिकेट संघाने अखेर बहुचर्चित प्रश्नांना पूर्णविराम लावत बाबर आझमची पुन्हा एकदा कर्णधार म्हणून नियुक्ती केली. निर्धारित षटकांचे क्रिकेट म्हणजे टी-२० आणि वनडे संघासाठी बाबर आझम पाकिस्तान क्रिकेट संघाचा कर्णधार असेल असे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या ट्विटरद्वारे स्पष्ट केले.

पाकिस्तानच्या टी-२० संघाचा कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी होता, पण त्याला कर्णधारपदावरून हटवण्यात आल्याचे समजताच त्याने पद सोडले. त्यानंतर बाबरला पुन्हा नेतृत्वाची संधी देण्यात आली आहे. माहितीनुसार शाहीन आफ्रिदी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्यावर नाराज होता. नक्वी आणि निवडकर्त्यांनी आफ्रिदीशी चर्चा न करता त्याला कर्णधारपदावरून काढण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले गेले. शाहीनच्या नेतृत्वात पाकिस्तानने केवळ एक टी-२० मालिका खेळली. त्यातही त्यांचा ४-१ असा पराभव झाला. त्यामुळे त्याला पदावरून हटवण्यात आले असल्याची चर्चा आहे.

शाहीन आफ्रिदी कर्णधारपद सोडण्यास तयार होताच, पण बोर्डाकडून याबद्दल कोणतीही सूचना मिळाली नसल्याचे त्याने सांगितले होते. माजी कर्णधार बाबर आझमवर आता पुन्हा एकदा ही जबाबदारी सोपवली गेली आहे. या यादीत बाबरसोबतच मोहम्मद रिझवानने नाव शर्यतीत होते, पण बाबरलाच संधी मिळाली.

# बंगळुरू संघामधील गोलंदाजांच्या मर्यादा उघड

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) अवघ्या तीन सामन्यांच्या आधारे कोणत्याही संघाबाबत मत मांडणे कठीण आहे, पण बंगळुरूच्या गोलंदाजीत विविधता नसल्यामुळे यंदाचा हंगाम या संघासाठी दमछाक करणारा ठरणार आहे




कोलकाताविरुद्ध १८३ धावांच्या आव्हानाचा बचाव करताना बंगळुरूचे गोलंदाज प्रतिस्पर्धी संघातील फलंदाजांना मोठे फटके खेळण्यापासून रोखू शकले नाहीत. त्यामुळे बंगळुरूला सात गड्यांनी पराभव पत्करावा लागला. विशाख विजयकुमार हा एकमेव गोलंदाज असा होता ज्याने 'नकल बॉल'चा चांगला वापर करीत २३ धावांत गडी बाद केला, पण संघातील इतर अनुभवी गोलंदाज विविधता आणण्यात अपयशी ठरले.

विजयकुमारने सामन्यानंतर सांगितले की, दुसऱ्या डावात फलंदाजी करणे अधिक सोपे होते, कारण दव असल्यामुळे चेंडू वेगाने बॅटवर येत होता. मी हार्ड लेंथ बॉल टाकण्याचा प्रयत्न करीत होतो. आम्ही फलंदाजांना रोखण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची गोलंदाजी करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना रोखू शकलो नाही.






# 'स्पीड-मशीन' मयंक यादव चर्चेत

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्स संघाने घरच्या मैदानावर विजय मिळवला. २०० धावांच्या पाठलाग करताना पंजाब संघाची गाडी १०व्या षटकापर्यंत रूळावर होती, पण नंतर एका नवख्या खेळाडूने पंजाबची वरची फळी बाद करत संघाला दणका दिला. त्यानंतर पंजाबला सावरता आले नाही. वेगवान मारा करणाऱ्या या खेळाडूचे नाव म्हणजे मयंक यादव. त्याने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात सर्वांत वेगवान चेंडू टाकत साऱ्यांना अवाक् केले. त्याशिवाय पहिल्याच सामन्यात तीन विकेट घेत सामनावीराचा किताबदेखील पटकावला.



२१ वर्षीय मयंक यादवने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात साऱ्यांनाच आश्चर्यचकित केले. त्याने आपल्या चार षटकांत सरासरी १५० किमी प्रति तास वेगाने गोलंदाजी केली. त्याने टाकलेल्या २४ चेंडूंपैकी तब्बल नऊ चेंडू हे १५० किंवा त्यापेक्षा जास्त वेगाने टाकलेले होते. त्यात सर्वांत वेगवान चेंडू हा १५५.८ किमी प्रति तास इतका होता. यंदाच्या आयपीएलमधील हा सर्वांत वेगवान चेंडू ठरला.

मयंक हा दिल्लीचा असून दिल्लीसाठी देशांतर्गत क्रिकेट खेळलेला आहे. त्याने आतापर्यंत १० टी-२०मध्ये १२ बळी, तर १७ प्रथम श्रेणी सामन्यात ३४ विकेट्स घेतल्या आहेत.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com